cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१९ | सोमवार दि.२९ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### लॅन्सेन्ट चा अहवाल अंजन घालणारा...

महिलांमध्ये स्तनांच्या कॅन्सरचे प्रमाण धोकादायकपणे वाढत आहे. लॅन्सेन्ट च्या अहवालात हा निष्कर्ष नमूद आहे. हे प्रमाण २०२० मध्ये २३ लाख इतके होते. २०४० पर्यंत ते ३० लाखांपर्यंत जाण्याचा इशाराही त्यात आहे. अहवाल कॅन्सरपुरता मर्यादित असला तरी एकूणच महिलांच्या अनारोग्यविषयी जी सर्वेक्षणे अधनूमधून प्रसिद्ध होतात त्याचेही निष्कर्ष काहीसे नकारात्मकच आढळतात. निरोगी जीवनशैली ठरवले तर अप्राप्य अजिबात नाही.

### संविधान बदलण्यासाठीच यांना ४०० जागा पाहिजेत - शरद पवार

सासवडः मोदी आणि त्यांचे सहकारी ज्या पद्धतीने देश चालवत आहेत. हे पाहिल्यानंतर चिंता वाटते. नरेंद्र मोदी हे हुकूमशाहीच्या रस्त्याने निघाले आहेत. लोकशाही उद्ध्वस्त करणार आहेत. हुकूमशाही करणाऱ्याला खड्यासारखे बाजूला काढू टाका, असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी केले. सासवड येथे महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या सभेमध्ये शरद पवार बोलत होते. या सभेला शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांच्यासह महाविकास आघाडीतील नेते उपस्थित होते.

# शेती कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ होणार

## राज्य सरकारचे बँकांना आदेश!




पुणे । प्रतिनिधी

सरकारने राज्यातील शेतकऱ्यांना १,६०,००० पर्यंतच्या कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ केले आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज घेताना ५०० रुपयांच्या स्टॅम्पऐवजी १ रुपयांच्या तिकिटावर कर्ज मिळेल. हा निर्णय १ एप्रिल २०२४ पासूनच लागू असणार आहे. आणि नवीन पीक कर्ज घेणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना लागू होईल. या निर्णयाचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल आणि त्यांच्या कर्जावरील खर्च कमी होईल. असे सांगितले जात आहे.

यापूर्वी नव्याने पीक कर्ज घ्यायचे असल्यास अनेक शेतकऱ्यांना मुद्रांक शुल्काचा अतिरिक्त भार सोसावा लागत होता. शेतकऱ्यांना किमान ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क घेऊन नव्याने पीक कर्ज घ्यायचे असल्यास संबंधित बँक शाखेत अर्ज करावा लागायचा. मात्र, आता मुख्यमंत्र्यांनी मुद्रांक शुल्क माफ केल्यानंतर, या निर्णयाच्या अंमलबजावणीची अनेक शेतकरी वाट पाहत होते. अखेर संबंधित बँक शाखांना राज्य सरकारकडून तसे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### कोणत्या कर्जाचे शुल्क माफ होणार?

ज्यामुळे राज्य सरकारच्या या निर्णयामुळे ही मुद्रांक शुल्क माफी केवळ १,६०,००० लाखापर्यंतच्या कर्जावरच लागू असणार आहे. १ एप्रिल २०२४ पासून नव्याने पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना हे मुद्रांक शुल्क माफ होणार आहे. परिणामी, आता कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना मुद्रांक शुल्क भरावे लागणार नाही. तर केवळ एक रुपयाच्या तिकिटावर पीक कर्ज दिले जाईल. तसे आदेश बँकांना मिळाले आहेत.

## देशभरात उष्णतेची लाट!

### काही राज्यांना रेड अलर्ट

पुणे ।प्रतिनिधी

देशभरात वाढत्या उष्म्याने नागरिक हैराण झाले आहेत. देशातील अनेक भागात तापमान ४० अंश सेल्सिअस किंवा त्याहून अधिक आहे. भारतीय हवामान विभागाने ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्ये उष्णतेच्या लाटेबाबत रेड अलर्ट जारी केला आहे. तर बिहार आणि झारखंडमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुढील अनेक दिवस उष्णतेची लाट कायम राहणार असल्याचेही हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. पुढील तीन दिवसांत तापमानात हळूहळू एक ते दोन अंश सेल्सिअसची वाढ होऊन पुढील दोन दिवस कोणताही मोठा बदल होणार नाही, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

हवामान खात्यानुसार, उष्ण आणि दमट हवामानामुळे बंगाल आणि पान २ वर

# "संतांच्या ठायी गळून पडती जाती-पाती"

## मनोज जरांगे पाटील, पंकजा मुंडे एकाच व्यासपीठावर ; खाली बसलेल्या पंकजाताईंना जरांगे पाटलांनी द्यायला लावली खुर्ची



बीड । प्रतिनिधी


जिल्ह्यात लोकसभा निवडणुकिचा प्रचार जोरावर सुरू आहे. यात मोठ्या प्रमाणात जाती पातीचे राजकारण होत असल्याचे दिसत आहे. या पार्श्वभुमीवर मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील आणि संघर्षकन्या पंकजाताई मुंडे श्री क्षेत्र नारायण गडाच्या नारळी सप्ताहाच्या सांगतेच्या निमित्ताने एकाच व्यासपीठावर आल्याचे पाहायला मिळाले. या दोघांची संतांच्या व्यासपिठावर झालेली भेट म्हणजे, संतांच्या ठायी गळून, पडली जाती पाती, असेच म्हणावे लागेल.

गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे धाकट पंढरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री क्षेत्र नारायण गडाच्या नारळी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. रविवार दि.२८ रोजी या सप्ताहाचा सांगता समारंभ होता. यानिमित्ताने या दोघांची भेट झाली. त्या दोघांमध्ये यावेळी संवादही झाला. सुरुवातीला पंकजाताई आल्या तेव्हा त्यांना बसायला खुर्ची नसल्याने त्या खालीच बसल्या तेव्हा स्वतः मनोज जरांगे पाटील यांनी पंकजाताईंना देखील खुर्ची द्या, अशी सूचना केली. त्याबरोबर संयोजकांनी जरांगे पाटील यांच्या शेजारी पंकजाताईंना देखील बसायला खुर्ची दिली. पंकजाताई यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या तब्येतीची विचारपुसही केली.

मागील काही महिन्यांपासून मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मराठा आरक्षणाचा उभा असलेला लढा व त्यातच पान २ वर

## महाराष्ट्र दिनी ना. भुजबळ यांच्या हस्ते हॉटेल सनराईज एक्झिक्युटिव्हचा पुनरउभारणी सोहळा

### पालकमंत्री ना. धनंजय मुंडे, माजी खा. समीरभाऊ भुजबळ यांची राहणार उपस्थिती



बीड । प्रतिनिधी

बीड शहरापासून जवळच असलेल्या धुळे सोलापूर महामार्गावरील नामलगाव फाटा येथे पुनरउभारणी करण्यात आलेल्या हॉटेल सनराइज् एक्झिक्युटिव्ह प्युअर व्हेज रेस्टॉरंट अँड पान २ वर

## प्रा.सुरेश नवले मित्रमंडळाच्या वतीने आयोजीत कार्यकर्ता संवाद मेळाव्यास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा

### सुपेकर, उबाळे, जाधव, घोडके, शेळके, चव्हाण यांचे आवाहन



बीड । प्रतिनिधी

शहरातील सुर्या लॉन्स या ठिकाणी प्रा.सुरेश नवले मित्रमंडळाच्या वतीने आज (दि.२९) रोजी सायंकाळी ६.३० वाजता कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्यास बीड मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रा.सुरेश नवले यांनी गेल्या काही दिवसांपूर्वी शिंदे सेनेला रामराम ठोकत आपली नवी दिशा ठरविण्याचे पान २ वर

## आज सोलापूर जिल्ह्यात राजकिय धुराळा

### मोदी, ठाकरे, पवारांनंतर मनोज जरांगेही येणार

सोलापूर । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीमुळे सर्वत्र सर्वपक्षीय राजकारण्यांच्या तोफा सभांमधून धडाडत आहेत. सोलापूर लोकसभा मतदारसंघातील प्रचाराच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी, ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सभा एकाच दिवशी म्हणजे सोमवारी (ता. २९ एप्रिल) होणार आहेत. त्यातच आता मराठ्यांचे नेते मनोज जरांगे पाटील हेही सोमवारी सोलापूरमध्ये येत आहेत, अशी माहिती सकल मराठा समाजाच्यावतीने देण्यात आली. त्यामुळे सोमवारी सोलापूर हा सभांचा हॉटस्पॉट होणार आहे.

मनोज जरांगे पाटील यांचे सोमवारी (ता.२९ एप्रिल) सायंकाळी पाच वाजता मरिआई चौक येथे आगमन होणार आहे. मराठा समाजाच्या वतीने त्यांचे त्या ठिकाणी भव्य स्वागत करण्यात येणार आहे. पान २ वर

## नरेंद्र मोदी यांच्या दोन दिवसात सहा सभा

पुणे: लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात महायुतीच्या उमेदवारांसाठी राज्यात येत्या दोन दिवसांत २९ व ३० एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहा सभा होणार आहेत, अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवारी दिली. नरेंद्र मोदी यांच्या सोमवारी आणि मंगळवारी प्रत्येकी तीन सभा होणार आहेत. महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी सोमवारी सोलापूर, कराड आणि पुणे येथे तर मंगळवारी माळशिरस, धाराशिव आणि लातूर येथे प्रचारसभा होणार आहेत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२७ एप्रिल २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल : आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ४.०० क्विंटल | २,२०० | २,३१० | २,२५५ |
| ज्वारी/हायब्रिड : १०७.५० क्विंटल | २,२०० | ३,५६० | २,७८९ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : १६.०० क्विंटल | ९,३०० | ११,००० | १०,२३७ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: ३२.५० क्विंटल | २,४०० | २,७८६ | २,५३४ |
| चिंच/लोकल: १४.०० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| सोयाबीन: ३०.५० क्विंटल | ४,५३५ | ४,५७५ | ४,५६० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,५०० | ५,६७१ | ५,५८५ |

# जरांगे फॅक्टर अन् मराठा नेत्यांमध्ये अडकला मतदार

## ऐकायचे कोणाचे? शेवटच्या काही दिवसात जातीवादाच्या भिंती गळून पडणार



बीड । प्रतिनिधी

निवडणुका या पक्ष आणि नेत्यांच्या विचारधारेवर लढल्या जातात आणि जिंकल्याही जातात. उमेदवार कोण? यालाही त्यात महत्व असते. यावेळच्या लोकसभा निवडणुकीत मात्र हे सर्व दिसेनासे झाले आहे. बीड लोकसभा निवडणुकीत तर जरांगे फॅक्टर आणि नेत्यांच्या प्रभावात सध्या तरी मतदार अडकल्याचे दिसत असून नेमके



ऐकाचे कोणाचे या द्विधामनस्थितीत ते आहेत. त्यामुळे मतदारांचा मुड कसा आहे, याचा अंदाज बांधणे अशक्य आहे. तरीही शेवटच्या काही दिवसात उमेदवार कोण ? हेच मतदार पाहतील आणि त्यावेळी खऱ्या अर्थाने जातीवादाच्या भिंती गळून पडतील, असेही म्हटले जात आहे.

बीड लोकसभा निवडणुक दुरंगी होणार असून वंचित आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांच्या उमेदवारीने चांगलीच रंगत आणली आहे. भाजप उमेदवार पंकजा मुंडे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे या दोन्ही उमेदवारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत बजरंग सोनवणे यांचा खा. प्रितम मुंडे यांनी १ लाख ६८ हजारांपेक्षा जास्त मतांनी पराभव केला होता. त्यामुळे सोनवणे यांना त्या पराभवाचा वचपा काढायचा आहे. पान २ वर

### जातीवाद बीडच्या भवितव्यासाठी कधीही धोकाच!

बीड जिल्हा हा मागासलेला असला तरी संत परंपरेचा समृध्द असा वारसा आहे. जातीला थारा न देता माणूस आणि विकास हा केंद्रबिंदु राहिलेला आहे. त्यामुळे या निवडणुकीच्या काळात जे काही सुरु आहे. तो सरकार आणि यंत्रणेच्या विरोधात असलेला असंतोष आहे. त्यामुळे त्याची तिव्रता जरी जास्त असली तरी निवडणुक आणि न्याय हक्कासाठी असलेला लढा यात काय फरक असतो, हे बीड जिल्ह्यातील जनतेला चांगलेच माहित आहे. निवडणुक काळात कोणीही जर जातीयवाद करण्याचा प्रयत्न केला तर तो बीडच्या भवितव्यासाठी कधीही धोकाच असल्याची जाणीव जिल्हावासियांना नक्कीच असेल. त्यामुळे कोण उमेदवार जिल्ह्याच्या विकासासाठी योग्य आहे, याचाच विचार मतदार मतदानादिवशी करतील, असे म्हटले जात आहे.

# छगन भुजबळ यांनी समता परिषदेचे पाच उमेदवार उभे केले

## भुजबळांचा महायुतीवर दबाव आणण्याचा प्रयत्न

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक लोकसभा मतदारसंघातून निवडणुकीत माघार घेतलेले राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ हे समता परिषदेच्या माध्यमातून महायुतीवर दबावतंत्र वापरत असल्याची चर्चा सध्या रंगली आहे. समता परिषदेने राज्यातील पाच ठिकाणी उमेदवार दिले आहेत.

### काही लोक आमचे ऐकणार, काही ऐकणार नाही-छगन भुजबळ

याबाबत छगन भुजबळ म्हणाले की, काही लोक आमचे ऐकणार आहेत, काही लोक ऐकणार नाही, अनेक घडामोडी झाल्या त्याचे प्रतिबिंब पडत असते. अनेक जण ऐकताहेत महायुतीचे काम करताहेत, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. आता यावर महायुतीचे नेते नेमकी काय प्रतिक्रिया देणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्यभरात ५ जागांवर समता परिषदेचे पदाधिकारी लोकसभा निवडणूकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे समजते. पाचही पदाधिकाऱ्यांनी आपले उमेदवारी अर्ज घेतले आहेत. नाशिक, छत्रपती संभाजी नगर, बीड, दक्षिण अहमदनगर आणि कल्याण या मतसंघातून समता परिषद निवडणूक लढवणार असल्याची माहिती मिळत आहे. समता परिषदेच्या आडून भुजबळांचा ओबीसींची ताकद दाखवण्याचा पान २ वर




cmyk

cmyk



अग्रलेख

# लॅन्सेन्ट चा अहवाल अंजन घालणारा...

महिलांमध्ये स्तनांच्या कॅन्सरचे प्रमाण धोकादायकपणे वाढत आहे. लॅन्सेन्ट च्या अहवालात हा निष्कर्ष नमूद आहे. हे प्रमाण २०20 मध्ये २३ लाख इतके होते. २०४० पर्यंत ते ३० लाखांपर्यंत जाण्याचा इशाराही त्यात आहे. अहवाल कॅन्सरपुरता मर्यादित असला तरी एकूणच महिलांच्या अनारोग्यविषयी जी सर्वेक्षणे अधनूमधून प्रसिद्ध होतात त्याचेही निष्कर्ष काहीसे नकारात्मकच आढळतात. निरोगी जीवनशैली ठरवले तर अप्राप्य अजिबात नाही.

आहार आणि विहाराच्या योग्य सवयी, थोडासा व्यायाम, योगासने, ध्यान हे बदल दक्षतेने केले तर कॅन्सरच नव्हे तर अनारोग्याला दूर ठेवणे शक्य होऊ शकेल. तथापि महिलांना मात्र हा बदल सहज शक्य वाटत नाही. त्या इतरांच्या प्राथमिकतेला अधिक प्राधान्य देतात. मानसिक आणि शारीरिक आरोग्याकडे बघण्याचा महिलांचा दृष्टिकोन हाच कळीचा मुद्दा आहे. स्वत:ला गृहीत धरण्याची सवय खोलवर रुजली आहे. घराची संपूर्ण जबाबदारी आहे मग आजारी पडून कसे चालेल, असेच बहुसंख्य महिलांना वाटते. तेच बरोबर आहे असे समाजही मग मानतो. परिणामी अनारोग्याच्या छोट्या छोट्या तक्रारी किंवा लक्षणांकडे महिला सर्रास दुर्लक्ष करतात. अगदी असह्य झाल्यावरच डॉक्टरकडे जाणे गरजेचे मानतात. औषधोपचार करून घेतानाही कुटुंबियांची गैरसोय झाल्याचे अपराधीपण अनेकींना वाटत असू शकेल.

चाचण्यांच्या निष्कर्षांची भीती अनेकींना वाटते. चाचणी केली आणि त्यात काही आढळले तर असा प्रश्न अनेकींना सतावतो. त्यामुळे देखील चाचण्या टाळण्याकडे कल आढळतो. महिलेने सांगेपर्यंत घरातील तिला बरे नाही हे तरी किती जणांच्या लक्षात येत असू शकेल? तथापि हेच दुर्लक्ष परवडणारे नाही याकडे लॅन्सेन्टचा अहवाल लक्ष वेधून घेतो. स्तनांच्या कॅन्सरचा विचार केला तर तो प्राथमिक टप्प्यात लक्षात आला तर बरे होण्याची शक्यता कैक पटींनी वाढू शकते. त्याची स्वतपासणी सोपी असल्याचे तज्ज्ञ सांगतात. ती कशी करायची हे देखील शिकवतात. प्रत्येक महिलेने ती केली तर कदाचित बदल त्यांच्याच सर्वात प्रथम लक्षात येऊ शकतील. तज्ज्ञांकडे योग्य वेळेत जाणे शक्य होऊ शकेल. पण हे सगळे घडून येण्यासाठी महिलांचा स्वत:कडे बघण्याच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल घडून यावा लागेल. ज्या दिवशी बदलाची सुरुवात होईल त्या दिवसापासून आरोग्यपूर्ण जीवनशैलीकडे त्यांचे पहिले पाऊल पडेल.

## मुंडेंचा बीड जिल्हा नव्हे तर ऊसतोड, भूमिहीन शेतमजुर, सुशक्षित बेरोजगारांचा जिल्हा-अजय सरवदे

**बीड । प्रतिनिधी**

**वंचित बहुजन आघाडीच्या अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी बीड शहरात शक्ती प्रदर्शन करत नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे त्यानंतर पारस मैदान माने कॉम्प्लेक्स या ठिकाणी जाहीर सभा ठेवण्यात आली होती.**




यावेळी वंचितचे युवा नेते अजय सरवदे यांनी सुत्रसंचालनातून ''बीड जिल्ह्याला भकास करण्याचे राजकारण परळीतून होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे'' परळी सोडता इतर तालुक्याला दुय्यम वागणूक दिली जात आहे. गेल्या २० वर्षांपासून मुंडे यांच्या घरात खासदार हे पद आहे परंतु त्यांना ऊसतोड, भूमिहीन शेतमजुरांचा जिल्हा ही ओळख संपवता आली नाही हे दुर्दैव असल्याचे सरवदे यांनी सांगितले. जिल्ह्याचा विकास करावयाचा असेल तर आरक्षणाचा लढ्यात पुढे असणारे वंचितचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना निवडून दयावे असे आवाहन केले या सभेस प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर, मराठवाडा महासचिव रमेश गायकवाड, निंबाळकर ताई, प्रा.विष्णू जाधव, जिल्हामहासचिव ज्ञानेश्वर कवठेकर, जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, युवक अध्यक्ष बाबुराव मस्के, जिल्हाउपाध्यक्ष बिभीषण चाटे, धनगर समाजाचे नेते विष्णू देवकते, डॉ.नितीन सोनवणे यांच्यासह नेते, आजी-माजी शहर, तालुका, जिल्हा पदाधिकारी, असंख्य कार्यकर्ते व महिलांची उपस्थिती होती.

## ठाकरे गटाच्या शिवसनेनंतर आप च्या प्रचार गीतावर आक्षेप

### गीत सुधारण्याचे निवडणूक आयोगाचे आदेश

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**केंद्रीय निवडणूक आयोगाने आम आदमी पक्षाला मोठा धक्का दिला आहे. पक्षाच्या प्रचार गीतामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा आणि फेरबदल करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. आम आदमी पक्षाने नुकतेच प्रचार गीत लाँच केले होते; परंतु केंद्रीय निवडणूक आयोगाने मात्र आपच्या या प्रचार गीतामध्ये सुधारणा करण्याचे आदेश दिले आहेत.**

भारतीय निवडणूक आयोगाने आम आदमी पार्टीला केबल टेलिव्हिजन नेटवर्क नियम, १९९४ आणि आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विहित केलेल्या जाहिरात संहितेनुसार, त्यांच्या निवडणूक प्रचार गीतातील सामग्री सुधारित करण्यास सांगितले आहे. फेरबदल केल्यानंतर हे प्रचार गीत पुन्हा आयोगासमोर सादर करावे, असाही आदेश देण्यात आला आहे.



आम आदमी पक्षाने नुकतेच त्यांचे लोकसभा प्रचार गीत लॉन्च केले होते. या दोन मिनिटांच्या या प्रचार गीतात अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदियाही दिसले. हे गाणे पक्षाचे आमदार दिलीप पांडे यांनी लिहिले आहे. दरम्यान 'आप'ने आयोगाचे हे पाऊल केंद्राची हुकूमशाही असल्याचे म्हटले आहे. ''जेल के जवाब मे हम वोट देंगे'' हे गीत आक्रमक जमाव अरविंद केजरीवाल यांचा फोटो धरून गात असल्याचे दाखविण्यात आले आहे. यामध्ये अरविंद केजरीवाल यांना कारागृहात दाखवले आहे, न्यायपालिकेवर आक्षेप घेतला आहे. पुढे, हा वाक्यांश निवडणूक आयोगाच्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या जाहिरातीमध्ये अनेकवेळा आढळतो. केबल टेलिव्हिजन नेटवर्क नियम, १९९४ अंतर्गत निर्धारित कार्यक्रम आणि जाहिरात कोडचे मार्गदर्शक तत्त्वे आणि नियम ६(१(जी),'' नुसार निवडणूक आयोगाने या संदर्भात स्पष्टीकरण दिले आहे. यासंदर्भात आपच्या ज्येष्ठ नेत्या आणि मंत्री आतिशी म्हणाल्या की, प्रचार गीतात कुठेही भाजपचा उल्लेख नाही. मतदानाने तुरुंगात उत्तर देण्यास निवडणूक आयोगाचा आक्षेप आहे, तो पूर्णपणे चुकीचा आहे. या गाण्यावर बंदी घालावी, असे आक्षेपार्ह काहीही नाही. त्यामुळे या गाण्यातून कुठेही निवडणूक आचारसंहितेचा भंग होत नसल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

## पोकलेन मशिनमुळे पारंपरिक पद्धतीने क्रेनच्या सहाय्याने विहिर खोदकाम कामाला घरघर

**बीड । प्रतिनिधी**

**काळाच्या ओघात नवनवीन तंत्रज्ञानाचा शोध लागला पोकलेन मशिनच्या मदतीने ३-४ दिवसात ४०-५० फुटांपर्यंत विहिर खोदाई होत असल्याने मशिनला मागणी वाढली असुन त्याच वेळी पारंपारिक पद्धतीने विहीर खोदाईसाठी ३-४ महिन्याचा कालावधी लागत असे.७०-८० च्या दशकात ४० ते ५० फुट विहिर खोदाई करायची असेल तर बैलांच्या सहाय्याने शिकाळीच्या मदतीने दोन ते तीन वर्षांत काम व्हायचे.त्यानंतर २० वर्षांपासून क्रेन मथुरा आल्यानंतर हीच कामे ३-४ महिन्यांवर येऊन ठेपली असुन जानेवारी ते एप्रिल महिन्यात कामे करण्यात येतात.पारंपारीक पद्धतीने विहीर खोदाईसाठी वेळ आणि पैसाही जास्तीचा लागत असे.कमी कालावधीत आणि कमी पैशात मशिनरीने खोदाई होत असल्याने मशिनरीला जास्त मागणी असल्याने क्रेनच्या सहाय्याने विहीर खोदकामाला घरघर लागली आहे.**





विहिर खोदकाम करताना तळातले काम खुपच जिकिरीचे आणि धोकादायक असुन जीव मुठीत धरून काम करावे लागते.क्रेनच्या सहाय्याने मोठमोठे दगड वर काढताना कामगारांच्या अंगावर पडण्याची भिती असते.त्यामुळे फार लक्ष ठेवून काम करावे लागते.तरीही मेहनतीच्या मानाने मोबदला कमी असल्याचे १२ वर्षांपासून काम करणारे मजुर राजाभाऊ शेळके, बाबासाहेब जोगदंड, सर्जेराव शेळके,भारत शेळके,गणपत शेळके यांनी सांगितले. सध्या कमी वेळात आणि कमी खर्चात पोकलेन मशिनच्या सहाय्याने विहिरी खोदकाम मोठ्या प्रमाणावर होत असल्याने क्रेनचालकांवर उपासमारीची वेळ आली आहे.बांधुन काढलेल्या विहिरीतील खोदकामातील आवाज घेतलेले दगड अथवा गाळ काढण्यासारखी तुरळक कामे मिळतात.त्यातही १५०० रूपये दिवसावर काम करताना एक मजुर आणि वाढलेले डिझेलचे भाव यामुळे जगणं अवघड झालं असल्याचे क्रेनचे चालक हरिभाऊ जगताप यांनी सांगितले. ग्रामीण भागात भुगर्भाचा अभ्यास शास्त्र शुद्ध पद्धतीने करण्याची गरज आहे.मात्र याचा विचार न करता आजही ग्रामीण भागात पाणाड्याला आमंत्रित केले जाते आणि भुगर्भातील पाण्याचा शोध घेतला जातो.पानाड्या हा शेतामधील आपट्याचे झाड,शमीचे झाड अथवा ज्या ठिकाणी ४ झाडांचा संगम आहे अशा ठिकाणी ओलसरपणा असल्याचे गृहीत धरून विहिर खोदली जाते.यामागे कोणतेही शास्त्र नसले तरी ग्रामस्थांच्या भावना लक्षात घेऊन असे प्रकार केले जातात. पाणी लागले तर पानाड्याचे नाव होते नाही लागले तर आपलं नशीब म्हणून शेतकरी त्याचा बोभाटा करत नाहीत. कोणत्या भागात विहीर घेतल्यानंतर पाणी लागणार आहे याचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे आवश्यक आहे.पावसाळ्या नंतरच्या ३ महिन्यात भुगर्भात पाणी मुरण्याची प्रक्रिया थांबलेली असते परंतु या प्रक्रियेमुळे भुगर्भ खोदण्यासाठीची क्रिया सोपी असते म्हणून जानेवारी ते एप्रिल महिन्यात विहीर खोदकाम करण्यात येते .विहिर खोदण्यासाठी जमिन नैसर्गिक दृष्ट्या जमिनीमध्ये पाण्याचे संचयन करणारी,सांधे असणा-या दगडांमध्ये किंवा मुरूमाचा स्थर असणा-या दगडांमध्ये पाणी जास्त मुरते याठिकाणी विहिरी खोदण्याचे प्रमाण जास्त असुन विहीर खोदकाम करताना दगडाचा प्रकार महत्वाचा असुन मांज-या दगडांमध्ये सच्छिद्रता असते त्याठिकाणी पाण्याचे संचयन क्षेत्र जास्त असते.नदीपासुन काही अंतरावर,मऊ खडकांमध्येच खोदल्या जातात.मुरमाड खडक जर अधिक खोलवर असेल तर त्या भागात अधिकचे पाणी लागते.कठीण पाषाण खडकात पाणी लागत नाही.

## नेरूळमधून बांगलादेशी कुटुंबास अटक

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

**१७ वर्षांपासून बेकायदेशीर वास्तव्य करणा-या बांगलादेशी कुटुंबावर नेरुळ पोलिसांनी कारवाई केली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे त्यांनी नेरूळमध्ये आश्रय मिळवला होता. पती, पत्नी व दोन मुले अशा चौघांचा यामध्ये समावेश आहे.**

नेरुळ परिसरात काही बांग्लादेशी व्यक्ती राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून वरिष्ठ निरीक्षक तानाजी भगत यांच्या सूचनेनुसार शुक्रवारी पोलिसांकडून परिसरातील संशयित नागरिकांची चाचपणी सुरु होती. त्यामध्ये सेक्टर १५ येथील एनएल २ वसाहतीमध्ये एका कुटुंबाची पाहणी करण्यात आली. यावेळी एका व्यक्तीने पोलिसांना दाखवलेल्या कागदपत्रांवर संशय आला. त्यामुळे कुटुंबाची कागदपत्रे तपासणी केली असता ते मूळचे बांगलादेशी असून भारतात घुसखोरी करून आले असल्याचे समोर आले. त्यानुसार अब्दुल शेख (५५), तेहमीना शेख (४२), हलीमा शेख यांच्यावर नेरुळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतात आल्यावर त्यांना मुलगा देखील झाला असून तो १२ वर्षांचा आहे. त्याला देखील पोलिस कुटुंबियांसोबत बांगलादेश येथे पाठविणार आहेत. नेरुळ परिसरातील एका कुटुंबाकडे तेहमीना ही १० वर्षांपासून घरकाम करत आहे. तर अब्दुल हा देखील परिसरात मिळेल ते काम करतो. मागील दहा वर्षात त्यांनी नेरुळ परिसरात ठिकठिकाणी भाड्याच्या घरात वास्तव्य केले आहे. गावठाणांमध्ये कोणत्याही कागदपत्रांची तपासणी न करता भाड्याने घर मिळवून ते राहत होते. २००८ मध्ये हे कुटुंब घुसखोरी करून भारतात आले आहे. तेंव्हापासून मागील १७ वर्षे ते पोलिसांची नजर चुकवून भारतात वास्तव्य करत होते. दरम्यान त्यांच्या संपर्कात भारतातील इतरही घुसखोर बांगलादेशी आहेत का याचा अधिक तपास नेरुळ पोलिस करत आहेत.

## लातूर जिल्ह्यातून १८ तलवारी, घातक शस्त्रांसह ७० लाखांचा मुद्देमाल जप्त

**लातूर । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्हा पोलिस दल अलर्ट झाले असून जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत सात वेळा कोम्बिंग ऑपरेशन करून १८ तलवारी, घातक शस्त्रही जप्त केली आहेत. यावेळी अवैध धंद्यावर कारवाई केली असून ७० लाखांचा मुद्देमाल जप्त केला.**

लातूर लोकसभेसाठी निवडणुकीसाठी ७ मेरोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन, निवडणूक विभाग आणि पोलिस दल सज्ज झाले आहे. १६ मार्च ते २७ एप्रिलअखेर जिल्ह्यात अवैध धंद्यावर कारवाईसाठी विशेष कारवाई मोहीम राबविण्यात आली. किोम्बिंग ऑपरेशन, प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीत पथसंचलन, मोठ्या प्रमाणावर गावभेटी, गुन्हेगार आणि शांतता भंग करणा-याविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. मटका-जुगारप्रकरणी जिल्ह्यात ९३ गुन्हे दाखल केले आहेत. तब्बल १४ लाख १० हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. देशी-विदेशी दारू, चोरट्या मार्गाने होणारी हातभट्टीची वाहतूक, निर्मिती, विक्री करणा-याविरुद्ध एकूण ५२६ गुन्हे दाखल केले. २६ लाख ६८ हजार २८९ रुपयांची देशी-विदेशी दारू जप्त केली आहे. हातभट्टी दारूसह, हजारो लिटर रसायन नष्ट केले आहे. सामाजिक शांतता धोक्यात आणणा-या पोलिसांच्या रेकॉर्डवरील सराईत, अट्टल गुन्हेगार, गुंडाविरोधात 'एमपीडीए'नुसार कारवाई करण्यात आली आहे. त्यांना एक वर्षासाठी स्थानबद्ध केले आहे. गत दीड वर्षाच्या कालावधीत नऊ आरोपींविरोधात स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. या काळात चार जणांविरोधात 'एमपीडीए'नुसार कारवाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात विविध २३ ठिकाणी, जिल्ह्यासह आंतरराज्य सीमेवर ९ चेक पोस्ट/नाकाबंदीच्या माध्यमातून वाहनाची तपासणी केली जात आहे. रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांचा शोध घेत गुन्हा करण्याच्या तयारीतील दबा धरून बसलेल्याविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. शिवाय, विविध आरोपींकडून १८ तलवारींसह घातक शस्त्र जप्त केल्याची माहिती पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांनी दिली.

## पान १वरून...

### देशभरात उष्णतेची लाट!

ओडिशामध्ये दिवसाचे कमाल तापमान आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागणार आहे. वाढती उष्णता आणि उष्णतेच्या लाटेबाबत भारतीय हवामानशास्त्र विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ सोमा सेन रॉय म्हणाले, 'ओडिशातही उष्णतेच्या लाटेमुळे परिस्थिती बिघडत आहे. अशीच परिस्थिती काही दिवस येथे राहणार आहे. त्यामुळे रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान खात्याने पूर्व उत्तर प्रदेश आणि उत्तर भागांसाठी 'यलो अलर्ट' जारी केला आहे. येथेही उष्णतेच्या लाटेमुळे लोकांचे हाल होऊ शकतात, असेही हवामानशास्त्र विभागाने म्हटले आहे.

००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००

### महाराष्ट्र दिनी ना. भुजबळ यांच्या हस्ते हॉटेल

लॉजिंगचा शुभारंभ सोहळा महाराष्ट्र दिनी दि. १ मे २०२४ रोजी दुपारी १२ : ३० वाजता होत आहे. राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या शुभहस्ते याचा शुभारंभ करण्यात येणार असून, या शुभारंभ सोहळ्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत व राऊत परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. या पुनरुभारणी सोहळ्यास जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री ना. धनंजय मुंडे आणि माजी खासदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष समीर भाऊ भुजबळ यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

------------------

### ''संतांच्या ठायी गळून

महाराष्ट्रासह देशात लागलेली लोकसभेची निवडणूक यामुळे एक वेगळाच तणाव सध्या वातावरणात आहे. परंतु वारकरी संप्रदायाच्या व्यासपीठावर संतांच्या ठायी जातीच्या भिंती गळून पडल्याचे पाहायला मिळाले. पंकजा मुंडे यांनी देखील आजपर्यंत कधीही मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला विरोध केलेला नाही किंवा अशा आरक्षण विरोधी कोणत्याही व्यासपीठावर कधीही पंकजा मुंडे गेलेल्या नाहीत. अलीकडच्या काही दिवसांमध्ये मनोज जरांगे पाटील यांनी देखील पंकजाताई मुंडे किंवा धनंजय मुंडे यांनी कधीही मराठा आरक्षणाला विरोध केलेला नाही, असे स्पष्ट केलेले आहे. स्वतः मनोज जरांगे पाटील यांनी कधीही एखाद्या विशिष्ट उमेदवाराला पाठिंबा दिलेला नाही किंवा याला मत द्या असे आवाहन केलेले नाही, इतकेच नव्हे तर पंकजाताई मुंडे असतील किंवा धनंजय मुंडे असतील यांना आम्ही मराठा आरक्षण विरोधी मानत नाही, अशीही जाहीर भूमिका त्यांनी घेतली होती. अशाही परिस्थितीत जिल्ह्यात वेगळा रंग देण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र, आज या दोघांच्या एकत्र येण्याने अशा लोकांना चपराक बसली आहे. आता या भेटीने दोन्ही समाजातील दुही कमी होऊ शकेल.

-------------

### आज सोलापूर जिल्ह्यात

स्वागत स्वीकारल्यानंतर मनोज जरांगे पाटील हे पुढे मंगळवेढा, सांगोला, सांगली मार्गे बेळगाव येथे जाणार आहेत. त्या ठिकाणी ते जाहीर सभा घेणार आहेत, अशी माहिती सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार यांनी दिली. मनोज जरांगे पाटील यांनी नुकताच ज्यांना पाडायचे आहे, त्यांना पाडा, असा सूचक संदेश मराठा समाजाला दिलेला आहे. त्या पार्श्वभूमीवर सोलापूरमध्ये येत असलेले मनोज जरांगे पाटील हे सोलापूरमध्ये मराठा समाजाला कोणाला पाडण्याचा संदेश देणार आहेत, याची उत्सुकता सर्वांना असणार आहे.

-----------

### प्रा.सुरेश नवले मित्रमंडळाच्या वतीने

संकेत दिले होते. आता पुढे काय ? असे प्रश्न कार्यकर्त्यांमधून विचारला जात असतानाच आज सोमवारी (दि.२९) सायंकाळी ६.३० वाजता याच अनुषंगाने कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन सुर्या लॉनस या ठिकाणी होणार आहे. या ठिकाणी प्रत्येक कार्यकर्त्याचे मत जाणून घेवून या विषयावर प्रदिर्घ चर्चा होणार आहे. त्यामुळे बीड मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने या मेळाव्याला उपस्थित रहावे असे आवाहन सुधीर सुपेकर, श्रीमंत उबाळे, शिवाजी जाधव, शहादेव घोडके, नामदेव शेळके आणि बिभीषण चव्हाण यांनी केले आहे.

---------

### जरांगे फॅक्टर अन् मराठा नेत्यांमध्य

तर दुसरीकडे पंकजा मुंडे यांचा २०१९ मध्ये परळी विधानसभा निवडणुकीत बंधू धनंजय मुंडे यांनी त्यांचा पराभव केला होता. तसेच साडेचार वर्ष त्यांना राजकीय वनवासात रहावे लागले होते. त्यामुळे पुन्हा मुख्य प्रवाहात येण्यासाठी पंकजा यांना मोठ्या फरकाने बीडमधून विजय हवा आहे. मुंडे आणि सोनवणे यांची ताकद पाहिली तर मुंडे यांच्या पाठीशी ओबीसी समाज मोठ्या प्रमाणात आहे तर सोनवणे यांच्या बाजूने मराठा समाज एकवटला आहे. पंकजा मुंडे यांच्याकडे मराठा नेत्यांची फौज आहे, त्यामुळे त्यांना मराठा मते पडतील असे म्हटले जात आहे. कारण सामान्य माणसांच्या कोणत्याही कामी आमदार आणि माजी आमदार व इतर नेते नेहमीच पडत असल्याने त्यांच्याशी थेट जिव्हाळा असतो. मात्र यावेळी परिस्थिती वेगळी आहे. मराठा आरक्षण आंदोलनामुळे विशेषत: मराठवाड्यात जरांगे फॅक्टर दिसून येत आहे. बीडच्या निवडणुकीत तर सुरुवातीपासूनच त्याचा प्रभाव जानवत होता. नेत्यांपेक्षा जरांगे यांचेच आम्ही ऐकणार असे लोक सांगतात. मात्र नेत्यांनी आतापर्यंत गावागावातील विकास कामे आणि वैयक्तिक कामे केल्याने जरांगे फॅक्टरचा प्रभाव जसजसे मतदान जवळ येईल तसा तो कमी होईल असेही म्हटले जात आहे. शेवटी मतदार आपल्या स्थानिक नेत्यांचे ऐकतील, असेही राजकीय जानकारांचे म्हणणे आहे. तसे झाले तर त्याचा फायदा पंकजा मुंडे यांना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर शेवटपर्यंत जरांगे फॅक्टर प्रभावी राहीला तर बजरंग सोनवणे यांच्या बाजूने मराठा समाजाची मते झुकतील, असे दिसते. शेवटी बीडचा मतदार हा जागृत असून जातीयवादाला खतपाणी कधीही घातीत नाहीत, असे अनेक निवडणुकांमधून दिसून आले आहे. तरीही यावेळी काय होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

------------

### छगन भुजबळ यांनी समता

प्रयत्न सुरु आहे का? अशी चर्चा आता रंगली आहे. दरम्यान, छगन भुजबळ यांनी पत्रकारांशी संवाद साधताना नाशिकच्या जागेवरून महायुतीला खोचक टोला लगावला आहे. छगन भुजबळ म्हणाले की, नाशिकच्या जागेवर माझ्यामुळे अडचण होत आहे, असे वाटले. म्हणून मी निवडणुकीतून दूर झालो. आता अर्ज भरायलाही सुरुवात झालीय. नाशिक लोकसभेसाठी २० मे रोजी मतदान पार पडणार आहे. तोपर्यंत तरी महायुतीने येथे उमेदवार जाहीर करावा, असा टोला त्यांनी लगावला आहे.

**हे पाच उमेदवार लोकसभेच्या रिंगणात**

१. दिलीप खैरे - नाशिक, २. मनोज घोडके - छत्रपती संभाजी नगर, ३. संतोष रासवे - बीड , ४. गोरख आळेकर - दक्षिण अहमदनगर , ५. मोतीराम गोंधळी - कल्याण

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. २९ एप्रिल २०२४


# जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी बीड आणि गेवराई विधानसभा मतदार संघांची केली पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी निवडणूकीच्या धर्तीवर आज २३० बीड आणि २२८ गेवराई विधानसभा मतदार संघांची पाहणी केली. जिल्हा परिषद शाळा गेवराई मतदान केंद्र येथील मुलभुत सुविधा व्यवस्थेची पाहणी केली. याठिकाणी मतदारांसाठी मतदाना नंतर असलेला सेल्फी पॉईंट उभारले आहे. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवारांना त्यांच्या प्रचार प्रसाराकरीता लागणाऱ्या पूर्वपरवानगी अनुमति देण्यासाठी निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही सुरू आहे का याबाबतचा आढावा नगरपरिषद कार्यालय गेवराई येथे जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी घेतला. यासह या मतदार संघात ८५ वर्षाच्या वरचे तसेच दिव्यांग मतदारांसाठी आयोगाने निर्धारित केलेल्या नियमानुसार कामे करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. बीड विधानसभा मतदार संघात आयोगाकडून आलेल्या साहित्य स्वीकृती व वितरण कक्षाला भेट देऊन पाहणी केली.



# मतदारांनी मतदान करून आपले कर्तव्य पार पाडावे : हातभर तक्रारीवर बोटभर उपाय म्हणजे मतदान - तहसीलदार भारस्कर

**वडवणी । प्रतिनिधी**

३९ बीड लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान सोमवार दि.१३ मे २०२४ रोजी होऊ घातलेले आहे या अनुषंगाने मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती दीपाताई मुधोळ मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली व निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी माजलगाव यांच्या सहकार्याने वडवणी तालुक्यातील मतदानाचा टक्का वाढवा म्हणून वडवणी येथील,तहसील कार्यालय,पंचायत समिती कार्यालय व गटशिक्षणाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृतीसाठी करण्यासाठी रविवार दि. २८ एप्रिल २०२४ रोजी आयोजित केलेली सायक्लोथॉन सायकल व मोटर सायकल रॅली वडवणी शहरातून संपन्न .

वडवणी शहरातील बीड-परळी राज्य महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून वडवणी तहसीलचे तहसीलदार




**मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी ऐतिहासिक सायक्लोथॉन सायकल व मोटरसायकल रॅली वडवणी शहरातून संपन्न**

दत्ता भारस्कर व गटशिक्षण अधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या उपस्थितीमध्ये सायक्लोथॉन सायकल व मोटरसायकल रॅलीला प्रारंभ झाला तेथून वसंतराव नाईक चौक,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,चिंचवण रोडवरील चाटे चौक तसेच चौंडेश्वरी मंगल कार्यालय, श्रीराम मंदिर चौक,भीम नगर मार्गे तहसील कार्यालयाच्या प्रारंगणामध्ये या ऐतिहासिक भव्य मतदार जनजागृती रॅलीची सांगता झाली. या रॅलीमध्ये लोकगीताच्या माध्यमातून मतदारांमध्ये मतदान जनजागृती केली,मतदारांना मतदानाची शपथ दिली तसेच गटशिक्षण अधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी आपले विचार व्यक्त करताना ते म्हणाले की,कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता निष्पक्ष व निर्भयपणे मतदान करून लोकशाही जिवंत ठेवावी असे आवाहन त्यांनी मतदारांना केले तसेच वडवणी तहसीलचे तहसीलदार दत्ता भारस्कर साहेब यांनी मतदारांमध्ये जनजागृती करताना ते म्हणाले की, निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव आहे निवडणुकापासून कोणीही वंचित राहणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी तसेच आपल्या घरातील प्रत्येक मतदाराला मतदान केंद्र पर्यंत नेऊन आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे हातभर तक्रारीवर बोटभर उपाय म्हणजे मतदान सर्व मतदारांनी मतदान करावे वडवणी तालुक्याचा मतदानाचा टक्का ८०% पेक्षाही जास्त जावा अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली. या रॅलीत सर्व शासकीय,निमशासकीय तसेच प्रशासकीय विभागाचे अधिकारी,कर्मचारी तसेच वडवणी शहरातील महाराणी ताराबाई व इतर शाळेमधील मुख्याध्यापक,शिक्षक, विद्यार्थी,पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते,पालक व मतदार नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# ग्रामीण रुग्णालय आष्टी येथे भव्य कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर संपन्न व उष्माघात विभाग सुरु

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय आष्टी येथे गुरुवार दि २५ एप्रिल रोजी बिन टाक्याची कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. सदर कॅम्प जिल्हा शल्यचिकित्सक डॉ अशोक बडे यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधीक्षक डॉ राहुल टेकाडे व स्त्री रोग तज्ञ डॉ सावंत, डॉ मस्तूद यांच्या मदतीने भव्य शिबिर आयोजित करून ५० लाभार्थ्यांचे कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्या. त्यासाठी येथील सर्व कर्मचारी, सिस्टर शेख बेबी, सिस्टर घोडके , मेहरकर , अशोक भुसनर व इतर आशा वर्कर यांच्या मदतीने शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या .तसेच दिवसेंदिवस वाढती उष्णता पाहून जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर अशोक बडे यांच्या कल्पनेतून नवीन उष्माघात व आपत्कालीन विभाग सुरू करण्यात आला असून त्यांनी उष्माघाताचे लक्षणे जसे अस्वस्थता, थकवा ,चक्कर, डोके दुखणे ,रक्तदाब वाढणे असे लक्षण जाणून आल्यास अती तत्काळ वैद्यकीय अधिकाऱ्यांना दाखवून घेण्यात यावे असे आवाहन केले. याबद्दल ग्रामीण रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांचे जनतेतून अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

# गुरुवर्य बाबांमुळेच डोंगरातली माणसंही डोंगराएवढ्या उंचीची झाली -आदिनाथ महाराज दानवे

म्हसोबावाडी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील देऊळगाव घाट येथे सदगुरु ब्र. रघुनाथ महाराज उंबरेकर यांनी प्रारंभ केलेला ६० वा नारळी सप्ताह अध्यात्माच्या मुशीत आणि गर्भागीरीच्या कुशीत वसलेल्या गुरुवर्य भागवत महाराज उंबरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात सुरू आहे.

आज चौथ्या दिवसाची सकाळची किर्तन सेवा देऊळगाव घाट भुषण, गर्भागीरीरत्न ह.भ.प. श्री आदिनाथ महाराज दानवे यांची झाली. माझीये जातीचे मज भेटो कोणी या संत तुकोबारायांचे अभंगावर विश्लेषण करताना महाराजांनी आपल्या काव्यमय रसाळ वाणीतून श्रोत्यांची मने जिंकली.गुरुवर्य बाबांसोबत काम



केलेल्या काही दिवंगत जेष्ठ व श्रेष्ठ व्यक्तीची उणीव आज भासत असल्याची भावना व्यक्त करुन त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.गुरुवर्य उंबरेकर महाराजरुपी परीसामुळे आमच्या जीवनाचे सोने झाले. आज या गावामध्ये प्रसिद्ध किर्तनकार, गायनाचार्य, मृदुंगाचार्य, प्रवचनकार बाबांमुळेच घडले. या डोंगरदरीतील माणसांना भक्तीमार्ग दाखवून या देऊळगाव घाट ची उंचीही आज तितक्याच उंचीवर गेली आहे याचे सर्व श्रेय गुरुवर्य बाबांनाच आहे अशी कृतज्ञ भावना महाराजांनी व्यक्त केली. महाराजांचे किर्तन कौतुकाने श्रवण करण्यासाठी ग्रामस्थ उत्स्फूर्तपणे उपस्थित होते.यावेळी देऊळगाव घाट , शेडाळा, सावरगाव, करंजी, घाटशिरस,मीरी, उंबरे, राहुरी, वांबोरी पंचक्रोशीतील भाविक भक्त उपस्थित होते. या सुवर्ण संधीचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन आदिनाथ सेवा मंडळ व सप्ताह कमिटीने केले आहे.

आमच्या गावचे भूमिपुत्र ह.भ.प. आदिनाथ महाराज दानवे यांनी आपल्या किर्तनसेवेच्या माध्यमातून गावाचा नावलौकिक वाढवला याचा आंम्हाला सार्थ अभिमान आहे.

-ग्रामस्थ

# आजपासून राजे धर्माजी गड येथे अखंड हरिनाम सप्ताह व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील हातोला- खलाटवाडी येथील श्री.क्षेत्र राजे धर्माजी गड या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह व पंचकुंडी महायज्ञ तसेच साधुसंत देवतांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्याचा प्रारंभ आज दि.२९/०४/२०२४ सोमवार पासून होत असून तर सांगता दि.६ मे २०२४ रोजी होत आहे.या संपूर्ण सोहळ्याचा भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घ्यावा असे आवाहन ह.भ.प.रोहिदास महाराज शास्त्री राजे धर्माजी गड व समस्त ग्रामस्थ हातोला-खलाटवाडी यांनी केले आहे.या सोहळ्याचे पहिलेच वर्ष असून दि.१ मे.२०२४ बुधवार रोजी सकाळी १०:३० वेळेत संत-महंत व विविध लोकप्रतिनिधींच्या शुभहस्ते व उपस्थितीत मूर्ति स्थापना होणार आहे. या ठिकाणी दैनंदिन काकडा भजन, विष्णुसहस्रनाम,ग्रंथराज,ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन,हरिपाठ,प्रवचन रात्री ७ ते ८ या वेळेत भाऊ- बाबा चरित्र वाचन,तसेच रात्री हरिकीर्तन व सामुदायिक जागर कार्यक्रम होणार आहेत.दि.२९/०४/२०२४ सोमवार रोजी ह.भ.प.किशोर महाराज खाडे (आळंदी) यांचे प्रवचन,तर ह.भ.प. विष्णु महाराज (श्री.क्षेत्र रामगड)यांचे किर्तन दि.३०/०४/२०२४ मंगळवार रोजी ह.भ.प.अर्जुन महाराज जायभाये (तेलंगशी) यांचे प्रवचन तर ह.भ.प.अतुल शास्त्री महाराज (तागडगाव) यांचे किर्तन दि.१ मे बुधवार रोजी ह.भ.प.सोहम महाराज



वाघ (आळंदी) यांचे प्रवचन तर ह.भ.प.महामंडलेश्वर त्रिविक्रमानंद शास्त्री(इंदुवासिनी संस्थान पिंपळनेर) यांचे किर्तन दि.२ मे २०२४ गुरूवार रोजी ह.भ.प.प्रकाश देवा दानी (सुरुडी) यांचे प्रवचन तर ह.भ.प.काशिनाथ महाराज (गणेश गड नागतळा) यांचे किर्तन दि.३ मे शुक्रवार रोजी ह.भ.प.अभिमन्यू खाडे महाराज (हनुमान गड) यांचे प्रवचन तर ह.भ.प. लक्ष्मण महाराज फड (कानिफनाथ संस्थान खडकवाडी) यांचे किर्तन दि.४ मे २०२४ शनिवार रोजी ह.भ.प. संदिपान महाराज तिडके (राजराजेश्वर गड भोगलवाडी) यांचे प्रवचन तर ह.भ.प.महंत महादेवानंद भारती महाराज (श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी) यांचे किर्तन दि.५ मे २०२४ रविवार रोजी ह.भ.प.अशोक महाराज (गोविंदगड) यांचे प्रवचन तर ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री (श्री.क्षेत्र गहिनाथ गड) यांचे किर्तन तसेच दि.६ मे २०२४ रोजी भागवत भास्कर ह.भ.प.रोहिदास महाराज शास्त्री मठाधिपती (राजे धर्माजी गड) यांचे काल्याचे किर्तनानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता सोहळा होणार आहे.या सप्ताह सोहळा व प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला संत-महंतासह आजी-माजी मंत्री, खासदार, आमदार,जि.प.अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य,पंचायत समिती सभापती, उपसभापती, सदस्य, चेअरमन, सरपंच, उपसरपंच,ग्रा.पं. सदस्य,पत्रकार आदीसह पंचक्रोशितील भाविक-भक्तांची उपस्थिती लाभनार आहे.

पान ६ वरून...

## राज्यात सरकार आल्यास

सरकली आहे.

बंजारा समाजाचे आरक्षण हिसकवून घेणाऱ्यांना धडा शिकवा

आमचा समाज मागास असताना भाजप नेत्यांनी सत्तेचा गैरवापर करून आमच्या जात प्रवर्गात इतर समाजाचा समावेश करून आमचे अधिकार आणि हक्क हिरावले आहेत. त्यामुळे आमच्या समाजावर अन्याय झालेला असून बंजारा समाज मागे पडत असल्याचे दिसत आहे. हा समाज ऊसतोड मजूर असून स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रतिनिधित्व मिळत नाही. तसेच बंजारा समाज ऊसतोड करणारा आहे. तरी देखील ऊसतोड महामंडळाचा अध्यक्ष इतर समाजाचा करून अन्याय केला जात आहे. अन्यायाचा बदला घेण्यासाठी आता भाजपची सत्ता उलथून टाकण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना बंजारा समाजाचा पाठींबा देण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे. असे महानायक ग्रुपचे संस्थापक भगवान राठोड यांनी सांगितले.

## डॉ.आंबेडकर जयंती महोत्सवास

खेड्यातील मतदार बोलून दाखवत आहे काल अशोक हिंगे पाटील यांनी आडस सोनवळा, मुलेगाव भावठाणा, केज, मसाजोग, गांजी आदी गावच्या आंबेडकर जयंती महोत्सव कार्यक्रमास भेटी दिल्या व मतदारांशी संवाद साधला यावेळी गावागावात हिंगे पाटील यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले .प्रत्येक गावातून सर्व जाती धर्मातील लोकांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणाऱ्या अशोक हिंगे पाटलांना संसदेत पाठवायचेच असा निर्धार मतदारांनी बोलून दाखविला यावेळी प्रत्येक ठिकाणी हजारो मतदारांची उपस्थिती दिसून आली.

## आपले प्रश्न मांडण्यासाठी

बजरंग सोनवणे यांच्या रूपाने आहे. त्यामुळे त्यांना मतदानरूपी आशिर्वाद देऊन दिल्लीला पाठवण्याचा निर्धार करू. असे आवाहन यावेळी उपस्थितांना आ.क्षीरसागर यांनी केले. या सभांसाठी स्थानिक पदाधिकारी, ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## जगतापांचे जयंत पाटील

काँग्रेस पार्टीला जागा मागण्याचा प्रश्नच नव्हता. तसेच यात आमचे नेते जयंत पाटील यांचा कुठलाही संबंध नाही. अपक्ष उमेदवाराचा प्रचार करताना माजी आमदार जगताप यांना टीका करण्याचा कोणताही अधिकार नाही. भाजपच्या अंतर्गत वादामुळे व त्यांना आलेले नैराश्यामुळे जगताप असे वक्तव्य करत आहेत. भाजप सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने आता जगतापांना कोणताच पक्ष राहिलेला नाही. त्यामुळे ते वैफल्यग्रस्त झालेले आहेत. त्यामुळे असे बिनबुडाचे आरोप करीत आहेत. ते त्यांनी ताबडतोब थांबवावे, अन्यथा जशास तसे उत्तर येथून पुढील काळात देण्यात येईल.

# परळीत सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा

**परळी । प्रतिनिधी**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी ब्राह्मण बहूद्देशीय सभा द्वारा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा आयोजित करण्यात आला असुन यंदाचे हे या उपक्रमाचे ४४ वे वर्ष आहे. या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन ब्राह्मण बहुद्देशीय सभेच्या वतीने करण्यात आले आहे.या सोहळ्याला सर्वस्तरीय मान्यवर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या शानदार सोहळ्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

ब्राह्मण समाजाची मध्यवर्ती संस्था असलेल्या ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने गेल्या ४३ वर्षापासून अविरतपणे हासामुदायिकउपनयनसंस्कारसोहळा उपक्रम चालवला जातो.शानदार आयोजन, नियोजनबध्द सोहळा या वैशिष्ट्यामुळे हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे.दर्शन मंडप श्री वैद्यनाथ मंदिर येथे आज सोमवार, दिनांक २९ एप्रिल रोजी सकाळी ११:१२ मी. वाजता सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा संपन्न होणार आहे. ब्रह्मविभूषण भागवतमर्मज्ञ ह.भ.प.बाळुमहाराज उखळीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व वे.शा.सं. मनोहरदेव जोशी यांच्या व समस्त ब्रह्मवृंद क्षेत्रपाध्यायांच्या वैदिक अधीपत्याखाली हा व्रतबंध सोहळा संपन्न होणार आहे.या सोहळ्यासाठी ब्राह्मण बहुद्देशीय सभेच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे.या सोहळयात विविध ठिकाणच्या २१ बटुंवर उपनयन संस्कार करण्यात येणार आहेत.

या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ब्राह्मण बहुद्देशीय सभा, स्वा.वी.दा. सावरकर प्रबोधिनी, पेशवा युवा संघटन,ब्राह्मण महिला आघाडी,ब्राह्मण युवक संघटना, पुरोहित संघटना आदींनी केले आहे.

# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन

सामुहिक श्री गुरुचरित्र पारायण सोहळा

**माजलगाव । प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने प्रति वर्षी प्रमाणे याही वर्षी श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी निमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताह दि ३० एप्रिल ते ६ मे दरम्यान येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात आयोजित करण्यात आला



असून या दरम्यान सामुहिक श्री गुरुचरित्र पारायण, गणेश याग, मनोबोध याग, श्री स्वामी याग, चंडी याग, श्री गिताई याग, श्री रूद्र, मल्हारी याग दररोज सकाळी नित्य स्वाहाकार, सायंकाळी विष्णु सहस्त्रनाम, भगवद्गीतेचा १५ वा अध्याय, संत तुकाराम महाराजांचे अभंग, पसायदान , मनाचे श्लोक, तसेच सकाळी ८ ते रात्री ८ महिला प्रहरे व रात्री ८ ते सकाळी ८ पुरुष प्रहरे व दि ०६ मे सोमवार रोजी सकाळी सत्यदत्त पूजन, बलिपुर्णाहुती व श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी निमित्त महाआरती अशा विविध उपक्रम व सेवा होणार असून या सेवेचा सर्व भाविक भक्त व श्री स्वामी समर्थ सेवेकरी यांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र (दिंडोरी प्रणित) शाहुनगर माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान ६ वरून...

## चंद्रहार पाटील यांच्या प्रचारात

खटाव, ब्रम्हनाळ, माळवाडी, भिलवडी ता.पलूस येथे माजी मंत्री विश्वजीत कदम, आ.अरुण आण्णा लाड, महेंद्र लाड, शरद लाड यांच्या प्रमुख उपस्थितीत सांगली लोकसभेच्या प्रचारादरम्यान बैठक पार पडली असे पाटील यांच्या फेसबुक पोस्टमध्ये म्हटले आहे. दरम्यान, विशाल पाटील यांच्या रुपााने महाविकास आघाडीत बंडखोरी झाल्याने मतविभाजन होऊन भाजप उमेदवार संजयकाका पाटील यांना फायदा होऊ शकतो असे बोलले जात आहे. त्यामुळे सांगलीच्या जागेवर नक्की कोणाचा विजय होणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. महाविकास आघाडीत सांगली लोकसभेच्या जागेवरून वादंग उठले. अखेर मविआमध्ये बंडखोरी होऊन काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष विशाल पाटील यांनी अपक्ष अर्ज ठेवला. त्यामुळे ही निवडणूक चुरशीची झाली आहे. उद्धवसेनेने पैलवान चंद्रहार पाटील यांच्या उमेदवारीचा हट्ट शेवटपर्यंत सोडला नाही. त्यामुळे महाविकास आघाडी विरुद्ध महायुती, अशी एकास एक लढत होण्याऐवजी तिरंगी झाली. खासदार संजय पाटील यांच्यासह भाजपसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची व काँग्रेससाठी अस्तित्वाची आहे. काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या सांगली लोकसभेसाठी उद्धवसेनेने अचानक प्रवेश घेत चंद्रहार पाटील यांची उमेदवारी जाहीर करण्याची घाई केली. त्यामुळे या जागेसाठी काँग्रेसचे विश्वजित कदम व विशाल पाटील यांनी संघर्ष केला. मात्र, वरिष्ठ नेत्यांकडून प्रतिसाद मिळाला नाही. उमेदवारीसाठी काँग्रेसचा 'एबी फार्म' न मिळाल्याने विशाल पाटील यांनी बंडखोरी केली. सांगलीच्या जागेच्या संघर्षामुळे दिवंगत माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील व डॉ. पतंगराव कदम या दोन्ही घराण्यांतील वाद मिटला. जिल्ह्यातील काँग्रेस एकवटली; पण ही जागा उद्धवसेनेला गेली. त्यामुळे विश्वजित कदम हे आघाडीधर्म पाळणार की बंडखोरीला साथ देणार, याबाबत तर्क-वितर्क लढवले जात होते. मात्र आता कदम यांनी आपली भूमिका स्पष्ट करत आपण आघाडी धर्माचे पालन करणार असल्याचे म्हटले आहे.

# रेशनच्या गहू-तांदळात घोळ

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथे राशन चा गहू, तांदूळ शासनाकडुन स्वस्त धान्य दुकाणदारास दिनांक २८ एप्रिल रविवार रोजी वितरित करीत असताना शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी जाय मोक्यावर जाऊन पोत्याचे वजन करण्याची मागणी केली असतां ५० किलोच्या कट्ट्यात तब्बल दीड ते दोन किलो राशन कमी आल्याची बाब समोर आली त्यावेळी तहसीलदार वर्ष मनाळे यांचा भ्रमणध्वनी बंद असल्याने त्यावेळी संबंधित भ्रष्ट अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्याची मागणी शेकापच्या वतीने भ्रमणध्वनीद्वारे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले




गोरगरिबाच्या ताटातलं राशन हिरावून घेणाऱ्यांना निलंबित करा -भाई ॲड. नारायण गोले पाटील

यांच्याकडे करण्यात आली.. यावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांसह शेकडो गावकऱ्यांनी घटनास्थळी ठिय्या मांडला. परंतु तहसीलदार वर्षा मनाले, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, पुरवठा अधिकारी यांनी कुठलीही कार्यवाही न केल्याने संतृप्त कार्यकर्त्यांनी राशनचा टेम्पो परत पाठवला असतासदरील वाहन तहसील कार्यालयात लावण्याच्या सूचना वितरिकांना तहसील कर्मचाऱ्यांनी दिल्या त्यामुळे उद्या गावकऱ्यांच्या उपस्थितीत तहसीलदार उपविभागीय अधिकारी यांची समक्ष पंचनामा करून कार्यवाही करण्यासाठी स्वस्त धान्य दुकानासमोर ठिया मांडण्याचा इशाराही कार्यकर्त्यांसह गावकऱ्यांनी दिला आहे..

## अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरातून चौदा वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवुन नेल्याची घटना समोर आली असून या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

भोसरी पुणे येथील १४ वर्षीय भाच्ची सुट्टी निमित्ताने परळी शहरातील नागसेन नगर भागात रहिवासी असलेल्या मामाकडे राहण्यास आली असता अज्ञात व्यक्तीने या अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेल्याची घटना घडली आहे.या प्रकरणी मुलीचे मामा यांच्या फिर्यादीवरून संभाजी नगर पोलीस ठाण्यात गुरन ६७/२०२४ कलम ३६३ भादवि नुसार अज्ञात व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास ठाण्याचे सपोनि जाधव हे करत आहेत.

# महाराष्ट्रात अवकाळी पावसाचं थैमान

## बीडमध्ये ५०० कोंबड्यांचा मृत्यू, विदर्भासह मराठवाड्याला झोडपलं

मुंबई : महाराष्ट्रावर अवकाळी पावसाचं संकट कायम आहे. राज्यात गेल्या आठवड्याभरात विविध जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस झाला आहे. विदर्भासह मराठवाड्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी आंबा, पपई बागांचं नुकसान झालं आहे. बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाचं संकट ओढवलं आहे. आष्टी तालुक्याला सर्वाधिक फटका बसला असून ५०० कोंबड्या मरण पावल्या आहेत. अनेक घरांचे छप्पर उडून गेलं आहे. यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे.

५०० कोंबड्यांच्या मृत्यू

बीड जिल्ह्यात मागील आठवडाभरापासून अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. परिणामी शेतकऱ्यांना या पावसाचा सामना करावा लागतोय. आधीच अडचणीत असणारे शेतकरी आता अवकाळीच्या संकटाला सामोरे जात आहेत. आष्टी तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने फळबागेसह पशुधन मृत्युमुखी पडले आहेत. सांगवी पाटण या ठिकाणी शेख दगडू यांच्या पोल्ट्री फार्ममधील ५०० कोंबड्या मरण पावल्या आहेत. प्रशासनाने या नुकसानग्रस्त परिस्थितीचा पंचनामा करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी केली जाते.

केळी आणि आंब्याच्या फळबागांचं मोठं नुकसान



बीडमधील धारूर तालुक्यात अवकाळी पावसामुळे केळी आणि आंब्याच्या फळबागाचं प्रचंड नुकसान झालं असून व्यथा मांडताना शेतकऱ्यांना अश्रू अनावर झाले आहेत. रात्री झालेल्या अवकाळी पावसामुळे धारूर तालुक्यातील कांदेवाडी येथे मोठ्या प्रमाणात केळी आणि आंब्याच्या फळबागांचं प्रचंड नुकसान झालं आहे, तर बारा एकरावर लावलेल्या केळीच्या बागा वादळी वारा आणि पावसामुळे जमिनदोस्त झाल्या आहेत. रात्रीच्या वेळी अचानक धारूर तालुक्यामध्ये अवकाळी पावसाला सुरुवात झाली, त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांनी बँकेचे आणि खाजगी सावकाराचं कर्ज काढून या बागा जोपासल्या होत्या आणि आता ऐन फळ तोडणीच्या काळामध्ये अवकाळी पावसानं शेतकऱ्याच्या हातात तोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. त्यामुळे बँकेचे कर्ज फेडायचे कसे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे तर, नुकसानीची व्यथा मांडताना काही शेतकऱ्यांना अश्रू रानावर झाले.

अवकाळीनं शेतातील पीक भुईसपाट

मागील दोन दिवसांपासून भंडारा जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं अक्षरशः थैमान घातलं. मध्यरात्रीच्या सुमारास वादळी वाऱ्यासह अवकळी पावसानं जोरदार हजेरी लावली. यामुळं शेतातील उभा मका, भातपीक अक्षरशः जमीनदोस्त झाले आहेत. तर, आंब्याचं मोठं नुकसान झालं आहे. यासोबतच बागायती पिकांचाही नुकसान झालं आहे. अनेकांच्या घरावरील छत उडाल्यानं घरातील जीवनोपयोगी साहित्याची नासाडी झाली आहे. कापणीला आलेले भातपीक आणि मका पिकाचं नुकसान झाल्यानं शेतकरी हवालदिल झाला आहे.

वांगे, कारली, काकडी पिकालाही अवकाळी पावसाचा फटका : गोंदिया जिल्ह्यामध्ये रात्री झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने आंबा पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. गोंदिया जिल्ह्यातील हौसीटोला या गावातील शेतकरी मुन्ना काठेवार यांनी आंब्याची बाग लावली आहे. काल अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने त्यांच्या बागेतील पूर्ण आंबे जमीनदोस्त झाले आहेत. तर वांगे, कारली, काकडी या पिकांना देखील प्रचंड नुकसान झाला. यात शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले असुन तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्याने केली आहे.

# कृषी खात्याला गती देण्यासाठी 'गेडाम पॅटर्न'

कृषी आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम सध्या सर्व कृषी योजनांचा बारकाईने अभ्यास करीत असून, कामकाजाला गती देणारी एक वेगळी प्रणाली ते विकसित करीत आहेत. कोणती योजना राबविण्यात कोणता विभाग पिछाडीवर किंवा आघाडीवर असल्याचे ही प्रणाली सांगणार आहे. या 'गेडाम पॅटर्न'विषयी आता क्षेत्रिय पातळीवर देखील उत्सुकता पसरली आहे. आयएएस' झाल्यापासूनच डॉ. गेडाम हे सेवेतील प्रभावी कामकाजाने राज्यभर परिचित आहेत. 'एमबीबीएस'असलेले डॉ. गेडाम २००२ मधील महाराष्ट्र तुकडीतून भारतीय प्रशासकीय सेवेत दाखल झाले. त्यांनी जळगावचे महापालिका आयुक्त म्हणून घरकुल योजनेतील गैरव्यवहाराचा पाठपुरावा केलाच; पण स्वतः पोलिसांकडे तक्रार करीत अनेक राजकीय पुढाऱ्यांना तुरुंगात पाठविले होते.

कोतवालाच्या कुटुंबीयांना कृषी विभागाकडून आर्थिक मदत

लातूर, सोलापूर, धाराशिव व नाशिक भागांत विविध पदांवर त्यांनी केलेली सेवा चर्चेत होती. आयुष्यमान भारत योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून केंद्रात देखील त्यांनी उत्कृष्ट सेवा बजावली. त्यामुळे कृषी आयुक्त म्हणून डॉ. गेडाम नव्याने नेमके काय करणार, याविषयी कृषी खात्यातील कर्मचाऱ्यांमध्ये कमालीची उत्सुकता आहे. आयुक्तलायच्या सूत्रांनी सांगितले, की डॉ. गेडाम प्रत्येक योजनेचा बारकाईने अभ्यास करीत आहेत. केंद्र व राज्याकडून अनेक शेतकरी कल्याण योजना राबवल्या जातात. तसेच आपत्कालीन स्थितीत उद्भवणारे विषय सतत हाताळावे लागतात. परिणामी, इतर खात्यांपेक्षा कृषी खात्याचे काम अधिक क्लिष्ट व संवेदनशील असल्याचे आयुक्तांच्या लक्षात आले. मुळात कोणती योजना कोणत्या टप्प्यात आहे, हेदेखील स्पष्ट करणारी प्रणाली सध्या नाही. त्यामुळे आयुक्तालयापासून ते तालुका पातळीपर्यंत प्रत्येक योजनेच्या कामकाजाला गती देणारी किंवा आढावा घेणारी प्रणाली तयार करायला हवी, असा निष्कर्ष आयुक्तांनी अभ्यासाअंती काढला. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सातत्याने सल्लामसलत करीत त्यांनी एक प्रणाली विकसित झाली आहे.

लाखभर वेतन मिळतानाही शेतकरी सेवेत कुचराई नको

काही अधिकारी या प्रणालीचा उल्लेख आतापासूनच 'गेडाम पॅटर्न' असा करू लागले आहेत. आयुक्तांनी तयार केलेल्या या प्रणालीचे संचालकांनी स्वागत केले आहे. ''सध्या निवडणूक आचारसंहिता असल्यामुळे ही प्रणाली अंतिम टप्प्यात आहे. परंतु लवकरच प्रत्यक्ष प्रणाली सर्वत्र लागू केली जाईल. दर आठवड्याला आयुक्त स्वतः आढावा घेतील. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना जलद सेवा मिळतील.

कारण, आपण पिछाडीवर राहू नये याची प्रत्येक विभाग काळजी घेईल. त्यामुळे संचालकांपासून ते तालुका कृषी अधिकाऱ्यापर्यंत कोणीही दिशाहीन काम करणार नाही.

एखाद्या योजनेत एकदम संथपणा किंवा वेग दिसत असल्यास ही प्रणाली चटकन्? कल (ट्रेन्ड) सांगेल. योजना राबविताना काही गैरप्रकार चालू असल्यास लक्षात येईल,'' अशी माहिती एका कृषी संचालकाने दिली.

# कमाल, किमान तापमानात वाढ; उष्णतेच्या लाटेची शक्यता

महाराष्ट्रावर उद्या (ता. २८) पासून शनिवार (ता.४ मे) या कालावधीत हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होईल. उद्यापासून बुधवारपर्यंत (ता.२८ एप्रिल ते १ मे) महाराष्ट्रावर १००६ हेप्टापास्कल तर गुरुवार (ता.२ मे) पासून पुढे १००४ हेप्टापास्कल इतके कमी हवेचे दाब राहतील. कमाल व किमान तापमानात वाढ होते, तेव्हा हवेचे दाब कमी होऊन हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होते. ज्यावेळी वारे हवेच्या जास्त दाबाकडून कमी दाबाच्या दिशेने वाहतात. तेथे मोठ्या प्रमाणात ढग जमा होऊन पाऊस पडतो. या काळातील पावसाला पूर्वमोसमी पाऊस असे संबोधले जाते. कोकण, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रात कमाल व किमान तापमानात वाढ होईल. हवामान उष्ण व कोरडे राहील. बहुतांशी भागांत कमाल तापमान ४० ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत, तर किमान तापमान २५ ते २६ अंश सेल्सिअसपर्यंत वाढेल. काही भागांत अल्पशा पावसाची शक्यता राहील. जेथे हवेचे कमी दाब राहतील तेथे विजांच्या कडकडाटासह पाऊस होईल.

अरबी समुद्र, हिंदी महासागर बंगालचा उपसागराचे पाण्याचे पृष्ठभागाचे तापमान ३१ अंश सेल्सिअसपर्यंत वाढेल. त्यामुळे पाण्याच्या बाष्पीभवनाचा वेग वाढेल. ढगनिर्मिती होऊन पश्चिम विदर्भात पावसाचे प्रमाण अधिक राहील. प्रशांत महासागराच्या पेरूजवळ पाण्याचे पृष्ठभागाचे तापमान १८ अंश सेल्सिअसपर्यंत घसरल्याने 'ला-निना'चा प्रभाव सुरू झाला आहे. त्यामुळे एप्रिल व मे महिन्यात पावसाची शक्यता निर्माण होईल.

कोकण : कमाल तापमान सिंधुदुर्ग जिल्ह्यात ३५ अंश सेल्सिअस, तर रत्नागिरी जिल्ह्यात ३७ अंश सेल्सिअस आणि रायगड जिल्ह्यात ३८ अंश सेल्सिअस राहील. ठाणे व पालघर जिल्ह्यांत कमाल तापमानात वाढ होऊन ते ४० अंश सेल्सिअस राहील. किमान तापमान सिंधुदुर्ग जिल्ह्यात २४ अंश सेल्सिअस, तर रत्नागिरी जिल्ह्यात २५ अंश सेल्सिअस राहील. किमान तापमान पालघर जिल्ह्यात २६ अंश सेल्सिअस तर रायगड व ठाणे जिल्ह्यांत २७ अंश सेल्सिअस राहील. सिंधुदुर्ग जिल्ह्यात आकाश अंशतः ढगाळ राहील. सकाळची



सापेक्ष आर्द्रता रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांत ७१ ते ८४ टक्के, तर रायगड व पालघर जिल्ह्यांत ५२ टक्के आणि ठाणे जिल्ह्यात ४१ टक्के राहील. दुपारची सापेक्ष आर्द्रता सिंधुदुर्ग जिल्ह्यात ५० टक्के, रत्नागिरी जिल्ह्यात ३० टक्के तर रायगड, पालघर व ठाणे जिल्ह्यांत २० टक्के राहील. वाऱ्याचा ताशी वेग ८ ते १० किमी राहील. वाऱ्याची दिशा नैऋत्य व वायव्येकडून राहील.

उत्तर महाराष्ट्र : कमाल तापमान धुळे जिल्ह्यात ४१ अंश सेल्सिअस तर नाशिक, नंदूरबार व जळगाव जिल्ह्यांत ४० अंश सेल्सिअस राहील. किमान तापमान सर्वच जिल्ह्यांत २६ ते २७ अंश सेल्सिअस राहील. आकाश अंशतः ढगाळ राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता नाशिक व जळगाव जिल्ह्यांत ३२ ते ३९ टक्के, तर धुळे व नंदूरबार जिल्ह्यांत २२ ते २६ टक्के राहील. दुपारची सापेक्ष आर्द्रता सर्वच जिल्ह्यांत १४ ते १९ टक्के राहील. वाऱ्याचा ताशी वेग ८ ते १० किमी राहील. वाऱ्याची दिशा वायव्येकडून राहील. सर्वच जिल्ह्यात अल्पशा म्हणजेच ०.६ मिमी ते १.२ मिमी पावसाची शक्यता आहे. मराठवाडा : आज व उद्या (ता.२८,२९) परभणी, हिंगोली, जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत ३.५ ते ४.५ मिमी तर धाराशिव, लातूर, नांदेड व बीड जिल्ह्यांत २.१ मिमी इतक्या अत्यल्प पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान धाराशिव, बीड व परभणी जिल्ह्यांत ४१ अंश सेल्सिअसपर्यंत वाढेल. तर लातूर, नांदेड, हिंगोली, जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत कमाल तापमान ४० अंश सेल्सिअस राहील. किमान तापमान नांदेड, बीड, परभणी, हिंगोली व जालना जिल्ह्यांत २३ अंश सेल्सिअस तर छत्रपती संभाजीनगर व धाराशिव जिल्ह्यांत २४ अंश सेल्सिअस आणि लातूर जिल्ह्यात २५ अंश सेल्सिअस राहील. आकाश अंशतः ढगाळ राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता सर्वच जिल्ह्यांत ४२ ते ४३ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता १८ ते २२ टक्के राहील. बीड व धाराशिव जिल्ह्यांत वाऱ्याचा ताशी वेग १५ ते १६ किमी तर उर्वरित सर्व जिल्ह्यांत ताशी १० ते १२ किमी राहील. वाऱ्याची दिशा ईशान्येकडून राहील.

पश्चिम विदर्भ : आज व उद्या (ता.२८,२९) अमरावती जिल्ह्यात ८.८ मिमी, वाशीम जिल्ह्यात ७.६ मिमी, अकोला जिल्ह्यात ६.० मिमी व बुलडाणा जिल्ह्यात ४ मिमी पावसाची शक्यता राहील. सर्वच जिल्ह्यांत कमाल तापमान ४० अंश सेल्सिअस तर किमान तापमान २४ अंश सेल्सिअस राहील. आकाश अंशतः ढगाळ राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ४६ ते ५० टक्के, तर दुपारची सापेक्ष आर्द्रता २१ ते २३ टक्के राहील. वाऱ्याचा ताशी वेग ८ किमी राहील. वाऱ्याची दिशा वायव्य व ईशान्येकडून राहील.

मध्य विदर्भ : आज व उद्या (ता.२८,२९) यवतमाळ, वर्धा व नागपूर जिल्ह्यांत २.४ ते ५.६ मिमी पावसाची शक्यता आहे. यवतमाळ, वर्धा व नागपूर जिल्ह्यांत कमाल तपमान ४० अंश सेल्सिअस तर किमान तापमान २३ अंश सेल्सिअस राहील. आकाश अंशतः ढगाळ राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ४० ते ४६ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता २० ते २१ टक्के राहील. वाऱ्याचा ताशी वेग ७ ते १० किमी राहील. वाऱ्याची दिशा नैऋत्येकडून राहील.

पूर्व विदर्भ : आज (ता.२८) गोंदिया जिल्ह्यात व भंडारा जिल्ह्यात ४ मिमी, चंद्रपूर जिल्ह्यात ३.२ मिमी व गडचिरोली जिल्ह्यात २ मिमी पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान गोंदिया जिल्ह्यात ३८ अंश सेल्सिअस, गडचिरोली जिल्ह्यात ३९ अंश सेल्सिअस तर भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यांत ४० ते ४१ अंश सेल्सिअस राहील. किमान तापमान चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यात २४ अंश सेल्सिअस, तर गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यांत २५ अंश सेल्सिअस राहील. आकाश अंशतः ढगाळ राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता भंडारा व गोंदिया जिल्ह्यांत ३८ टक्के, तर गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांत ४४ ते ४९ टक्के राहील. दुपारची सापेक्ष आर्द्रता सर्वच जिल्ह्यांत १६ ते १९ टक्के राहील. वाऱ्याचा ताशी वेग ६ ते ९ किमी राहील. वाऱ्याची दिशा वायव्येकडून राहील.

पश्चिम महाराष्ट्र : आज व उद्या (ता.२८,२९) सातारा, सोलापूर, पुणे व नगर जिल्ह्यांत ०.३ ते ०.६ मिमी पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान कोल्हापूर व सातारा जिल्ह्यांत ३९ अंश सेल्सिअस, पुणे व नगर जिल्ह्यांत ४० अंश, तर सांगली व सोलापूर जिल्ह्यांत ४१ ते ४२ अंश सेल्सिअस राहील. किमान तापमान सर्वच जिल्ह्यांत २५ ते २६ अंश सेल्सिअस राहील. आकाश अंशतः ढगाळ राहील. सर्वच जिल्ह्यांत सकाळची सापेक्ष आर्द्रता ३४ ते ४० टक्के, तर दुपारची सापेक्ष आर्द्रता १६ ते २० टक्के राहील. वाऱ्याचा ताशी वेग १० ते १५ किमी राहील. सांगली व सोलापूर जिल्ह्यांत वाऱ्याचा ताशी वेग १५ ते १८ किमी राहील. वाऱ्याची दिशा सर्वच जिल्ह्यांत वायव्येकडून राहील.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६३९ : मुघल सम्राट शाहजहान यांनी दिल्ली येथील लाल किल्ल्याचे निर्माण करण्यास पाया रचला.
१८१३ : अमेरिकन वैज्ञानिक जेएफ हम्मेल यांनी रबराचे नमुने सादर केले.
१९३० : ब्रिटन आणि ऑस्ट्रेलिया देशांतर्गत दूरध्वनी (टेलीफोन) सेवा सुरु करण्यात आली.
१९३३ : 'प्रभात'चा 'सिंहगड' हा चित्रपट प्रदर्शित झाला.
१९३९ : साली स्वातंत्र्य सेनानी नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षामधून आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.
१९४५ : दुसरे महायुद्ध इटलीतील जर्मन सैन्याने दोस्त राष्ट्रांपुढे बिनशर्त शरणागती पत्करली.
१९८६ : लॉस एंजेल्स सेंट्रल लायब्ररीतील आग लागल्यामुळे सुमारे ४,००,००० पुस्तक नष्ट झाले.
१९९१ : बांगलादेशच्या दक्षिण भागातील चितगाव जिल्ह्यात आलेल्या एका भीषण चक्रीवादळाने सुमारे १,३८,००० लोकांचा बळी घेतला तर सुमारे १ कोटि लोक बेघर झाले.
२००७ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाने श्रीलंकन क्रिकेट संघाचा पराभव करून तिसऱ्यांदा विश्वकप जिंकला.
२०११ : ब्रिटीश राजकुमार प्रिंस विलियम आणि केट मिडलटन यांचा विवाह पार पडला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५४२ : मेवाड प्रांताचे शासक महाराणा प्रताप यांचे मित्र, सहकारी आणि विश्वासपात्र सल्लागार भामाशाह यांचा जन्मदिन.
१७२७ : फ्रेंच नर्तक आणि बॅलेट चे निर्माते जीन-जॉर्जेस नोव्हर यांचा जन्म. (मृत्यू: १९ ऑक्टोबर १८१०)
१८४८ : राजा रविवर्मा चित्रकार (मृत्यू: २ आक्टोबर १९०६)
१८६७ : डॉ. शंकर आबाजी भिसे भारताचे 'एडिसन' (मृत्यू: ७ एप्रिल १९३५)
१८९१ : भारतीय कवी आणि कार्यकर्ते भारतीदासन यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल १९६४)
१९०१ : मिचेनोमिया हिरोहितो दुसर्या महायुद्धाच्या आधी व नंतरच्या काळातील जपानी सम्राट (मृत्यू: ७ जानेवारी १९८९)
१९१९ : साली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात विशेष कौशल्य मिळविणारे प्रख्यात भारतीय तबला वादक अल्ला रखा उर्फ अल्लारख्खा कुरेशी यांचा जन्मदिन.
१९५८ : पद्मभूषण व साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय इतिहासकार आणि अर्थशास्त्रज्ञ तसचं, द टेलीग्राफ, हिंदुस्तान टाईम्स आणि हिंदी दैनिक वृत्तपत्र अमर उजाला यांचे स्तंभलेखक रामचंद्र गुहा यांचा जन्मदिन.
१९३६ : झुबिन मेहता भारतीय संगीतकार
१९६६ : फिल टफनेल इंग्लिश फिरकी गोलंदाज
१९७० : आंद्रे आगासी अमेरिकन लॉनटेनिस खेळाडू
१९७९ : प्रसिद्ध भारतीय सेवानिवृत्त क्रिकेटपटू व जलदगती गोलंदाज आशिष नेहरा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२३६ : दिल्ली येथील सल्तनत साम्राज्याचे प्रभावी संस्थापक व दिल्लीच्या गादीवर राज्य करणारे पहिले मुस्लीम शासक शम्सउद्दीन इल्तुतमिश यांचे निधन.
१९४५ : हाइनरिक हिमलर जर्मन नाझी अधिकारी (जन्म: ७ आक्टोबर १९००)
१९५८ : भारताच्या उडीसा राज्यातील प्रख्यात स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिकारक व गांधीवादी कार्यकर्ता गोपबंधू चौधरी यांचे निधन.
१९६० : पं. बाळकृष्ण शर्मा ऊर्फ 'नवीन' हिन्दी कवी. हिन्दीला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळवण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. (जन्म: ८ डिसेंबर १८९७)
१९७९ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, पत्रकार, लेखक, क्रांतिकारक व समाजसुधारक राजा महेंद्र प्रताप यांचे निधन.
१९८० : श्रीकृष्ण के. क्षीरसागर लेखक, विचारवंत, समीक्षक (जन्म: ६ नोव्हेंबर १९०१)
१९८० : सर अल्फ्रेड हिचकॉक चित्रपट दिग्दर्शक (जन्म: १३ ऑगस्ट १८९९)
१९९७ : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे सतरावे गव्हर्नर व भारतीय प्रशासकीय सेवेचे सदस्य आर.एन.मल्होत्रा यांचे निधन.
१९९९ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक, निर्माता, पटकथा लेखक आणि हिंदी चित्रपटांचे गीतकार केदार शर्मा यांचे निधन.
२००६ : जे. के. गालब्रेथ कॅनेडियन-अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ (जन्म: १५ आक्टोबर १९०८)
२०१० : गायत्री मंडळाच्या संस्थापिका व सदस्या तसचं, समाजसेविका कमलादेवी शुक्ला यांचे निधन.

# जिप्सम म्हणजे काय?

जमिनीची सुधारणा आणि पिकांच्या वाढीसाठी जिप्सम महत्वाचे जिप्सम म्हणजे कॅल्शियम सल्फेट. हे एक चांगले प्रकारचे भूसुधारक आहे. चोपण जमिनीची सुधारणा त्याचप्रमाणे पिकांच्या वाढीसाठी जिप्सम चांगला उपयोगी पडतो. जिप्सम वर्षातून एकदा एक ते दिड टन एकरी जमिनीत टाकावा त्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते. चोपण जमीन सुधारित जमिनीत रुपांतरीत होते.

जिप्सम मुळे होणार फायदे : जिप्सम जमिनीची सुपीकता वाढवते. जमीन भुसभुशीत होते. जमिनीची रचना बदलण्यास मदत होते. क्षारपड जमिनीतील सोडियम क्षारांचे कण जिप्सम मुळे सुटे होतात. त्यामूळे ते बाहेर फेकले जाऊन जमीन सुधारते. बियाण्याची उगवण चांगली होते. पाण्याबाहेर येणारे क्षार जिप्सम मुळे कमी होतात. जमिनीची धूप कमी होते. पाण्याचा निचरा होऊन जमीन पाणथळ होत नाही. जमिनीतल्या कॅल्शियम मॅग्न्येशियामचे प्रमाण सुधारते. सेंद्रिय पदार्थ लवकर कुजतात. जिप्सम मुळे पिकाची अन्नद्रव्य शोषण क्षमता वाढते. जिप्सम मुळे फळांची गुणवत्ता सुधारते. भुईमुग, कलिंगड, टोमाटो, बटाटा या पिकांची गुणवत्ता सुधारते हे प्रयोगाअंती सिद्ध झाले आहे. जिप्सम मुळे पिकांना गंधक मिळतो. तो पिकांना आवश्यक असतो. जिप्सम मुळे पिकांची बाह्य कक्षा सुधारते आणि अन्नद्रव्ये जास्त शोषली जातात. जमिनीत वाढणाऱ्या कंद पिकांसाठी जिप्सम फायदेशीर आहे. त्यामुळे माती कंद पिकला चिटकत नाही. जमिनीतील हुमणीचे नियंत्रण होते. जिप्सम मुळे पिक वातावरणातील जास्त तापमान सहन करू शकतात. अशा प्रकारे जिप्समचे विविध फायदे आहेत. पण शेतकरी त्याचा वापर आपल्या शेतात करत नाहीत कारण त्याचे महत्त्व अजून शेतकऱ्यांना माहित नाही. कमी खर्चामध्ये फायदा म्हणजे जिप्समचा वापर त्यामुळे शेतकऱ्यांनी यांचा वापर करावा.

# १३ मे रोजी मतदान करायला घराबाहेर पडा

## जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कळकळीचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

सोमवार दिनांक १३ मे रोजी बीड लोकसभा मतदारसंघात मतदान असून मतदान करण्यासाठी मतदार नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे कळकळीचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी मतदान जनजागृतीसाठी आयोजित सायकल रॅलीच्या समापन कार्यक्रमात केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून मतदारांमध्ये मतदानाचा जागर करण्यासाठी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. खर्च निरीक्षक सुशांत कुमार बिस्वास हे या मतदार जागृत सायकल रॅलीच्या समापन कार्यक्रमात आवर्जून उपस्थित होते. आज बीड लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा बीड, केज, माजलगाव, आष्टी, परळी, गेवराई या विधानसभा मतदार संघांमध्ये ही सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या रॅलीला मतदार नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

त्यापुढे म्हणाल्या, बीड लोकसभा मतदार संघातील जिल्हा प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी तसेच जिल्हा परिषद, पोलीस विभागातील सर्वच अधिकारी, कर्मचारी असे जवळपास १५००० विविध शासकीय सेवेतील अधिकारी, कर्मचारी दिवस-रात्र निवडणुकीच्या विविध जबाबदारीचे वहन करीत आहेत. ही जबाबदारी मतदार नागरिकांनी मतदान करण्यासाठी पार पाडीत आहेत. मतदारांनी सोमवार दिनांक १३ मे रोजी घराबाहेर पडून मतदान करून मतदानाचा आपला हक्क बजवावा, असे कळकळीचे आवाहन त्यांनी यावेळी केले. भारतीय राज्यव्यवस्था न्यायपालिका, विधायिका, कार्यपालिका या तीन महत्त्वपूर्ण स्तंभांवर उभी असून कार्यपालिका म्हणून जिल्हा प्रशासन निवडणुकीचे काम चोख पार पाडत आहे. तर संसदेत पाठवण्याची जबाबदारी मतदारांची आहे मतदारांनी लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होऊन योग्य उमेदवार निवडून संसदेत पाठवावा आणि लोकशाही बळकट करावी, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. मागील दोन टप्प्यात मतदानाचा टक्का घसरल्याने बीडकरांनी मतदानात सक्रिय सहभागी होऊन बीडची जनता लोकशाही प्रिय आहे हे सिद्ध करून दाखवावे, असेही ते यावेळी म्हणाल्या.सायकल रॅली ला पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी हिरवा झेंडा दाखवून सायकल रॅलीचा शुभारंभ केला. सायकल रॅलीमध्ये जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्यासह निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, कार्यकारी अधिकारी नीता अंधारे, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त रवींद्र शिंदे, गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, स्विपचे नोडल अधिकारी, डॉ. विक्रम सारूक, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, नायब तहसीलदार सुहास हजारे , यासह रोटरी क्लब, लायन्स क्लब, योगा क्लब, डॉक्टर सायकल संघटनेचे सदस्यांमध्ये महिलांची संख्या ही अधिक होती. कॉलेज, शाळेकरी विद्यार्थी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक न्याय भवन पासून सुरुवात होऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून अन्ना भाऊसाठे चौक ते सुभाष रोड ते हिरालाल चौक ते बलभीम चौक ते बशीर गंज ते सिव्हिल हॉस्पिटल ते माने कॉप्लेक्स ते नाट्यगृह ते नगर नका ते भगवान बाबा चौक ते जिजामाता चौक ते डॉक्टर लाईन मार्गे शेवटी सामाजिक न्याय भवन असा सायकल रॅलीचा मार्ग होता.




### मतदान जागृती ची शपथ

मतदान जागृती साठी आयोजित सायकल रॅली समापन कार्यक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी 'आम्ही भारतीय नागरिक लोकशाहीवर आमचा विश्वास'आमिषाला बळी न पडता मतदान करू मतदान करू अशी प्रतिज्ञा घेत आहोत. अशी मतदान जागरुकतेची शपथ उपस्थितांना दिली.

## प्रतिज्ञा प्रमाणपत्र लिंकचे उद्घाटन

मतदार जागरुकता सायकल रॅलीच्या समापन कार्यक्रमात जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनातून मतदार जागृतीच्या संदर्भात स्वीप विभागाने तयार केली आहे. या लिंकवर क्लिक करून जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी मतदान जागृतीच्या नव्या उपक्रमाला आज सुरुवात केली. बीड लोकसभा मतदारसंघात दिनांक १३ मे रोजी मतदान होणार असून 'मी मतदान करणार' अशा आशयाची प्रतिज्ञा प्रमाणपत्राच्या स्वरूपात लिंक वर क्लिक केल्यावर प्राप्त केली जाऊ शकते. आज जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या हस्ते या लिंकचे उद्घाटन झाल्यावर अवघ्या दोन तासात लिंक ची दैनिक मर्यादा पुर्ण झाली. दिवसभरात १५०० मतदार 'मी मतदान करणार' असे प्रमाणपत्र प्राप्त करू शकतात. या लिंक वर क्लिक करून आपण जागरूक मतदार होऊ या, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी यावेळी केले. 'मी मतदान करणार' ही प्रतिज्ञा प्रमाणपत्र घेतल्यावर ते स्टेटसवर, व्हॉटसअॅप डीपी तसेच अन्य समाज माध्यमांवर ठेवून आपल्या सहकाऱ्यांना नातेवाईकांना मतदान करण्यासाठी उत्स्फूर्त करा, असेही ते यावेळी म्हणाल्या.

## परळी शहरात मतदार जनजागृती सायकल रॅली



परळी । प्रतिनिधी

बीड लोकसभा (३९) मतदार संघ अंतर्गत २३३ परळी विधानसभा मतदारसंघांत दि १३ मे २०२४ रोजी होणाऱ्या मतदानाकरिता मतदार जनजागृतीसाठी सायकल रॅली काढण्यात आली.या प्रसंगी सर्वच शासकीय, निम शासकीय कार्यालयातील अधिकारी,कर्मचारी, डॉक्टर आदींसह शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

मतदार जनजागृती करिता काढण्यात आलेली ही सायकल रॅली नवीन शासकीय विश्रामगृह, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मोंढा मार्केट, राणी लक्ष्मीबाई टॉवर, पोलीस स्टेशन , नगर पालीका अशी काढण्यात आली .नगर पालीका कार्यालयात सहभागी सायकल स्वार ,विद्यार्थी व कर्मचारी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला . रॅलीत सहभागी नागरिक व कर्मचारी , विद्यार्थी यांना मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी श्री अरविंद लाटकर साहेब यांनी प्रत्येक घटकातील मतदारांना जागृत करून येणाऱ्या १३ मे रोजी मतदानामध्ये सहभागी करून घेण्याचे आवाहन केले यासाठी सर्व अधिकारी कर्मचारी विविध सामाजिक संस्था नागरिक यांनी मतदार जनजागृती चे काम करावे असेही आव्हान त्यांनी याप्रसंगी केले . याप्रसंगी श्री वेंकटेश मुंडे तहसीलदार परळी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की लोकांनी स्वतःच्या आरोग्यासाठी स्वतः नियमित सायकल चालवणे गरजेचे आहे व लोकशाहीला बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने मतदान करण्याची आवश्यकता आहे .

याप्रसंगी मा.श्री अरविंद लाटकर (सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी), व्यंकटेश मुंडे (तहसिलदार), त्र्यंबक कांबळे (मुख्याधिकारी नगरपालिका), शिवाजी मुंडे (सहाय्यक गटविकास अधिकारी पंचायत समिती), बाबुराव रुपनर (नायब तहसिलदार), श्रीराम कनाके (गटशिक्षण अधिकारी), पोलीस विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी, डॉ.बालासाहेब कराड, डॉ.अजय केंद्रे यांच्यासह सर्व महसूल विभागाचे तलाठी ,मंडळ अधिकारी व नगरपालिकेचे अधिकारी ,कर्मचारी , पंचायत समिती व शिक्षण विभागाचे शिक्षक विद्यार्थी कर्मचारी , अनेक डॉक्टर्स , विविध शाळेचे व अॅकॅडमीचे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.या रॅलीचे चे नियोजन सूत्रसंचालन व आभार शाम अघाव यांनी केले , रॅली यशस्वी करण्यासाठी नायब तहसीलदार रुपनर सर्व अधिकारी, कर्मचारी गोविंद कराड, शाम अघाव, गंगाधर केलूरकर, सुरेखा थोरवे,नागरगोजे,चौधरी मॅडम रमा दासूद मॅडम,रेखा कोळपकर मॅडम, मंगल मुंडे मॅडम,विष्णु गीते,स्वामी सर यांनी परिश्रम घेतले .

## माजलगाव जैन भागवती दीक्षा महोत्सव दिमाखात पार पडला

माजलगाव । प्रतिनिधी

दिनांक २८ एप्रिल रविवार रोजी माजलगाव येथील शिवप्रताप मंगल कार्यालय येथे दीक्षार्थी मुमुक्ष कु.अंजली जैन यांचा जैन भागवती दीक्षा महोत्सव सोहळा दिमाखात पार पडला. अवघ्या पंधरा वर्षांची मुलगी अंजली हिने अथक परिश्रम घेऊन व जैन साधु साध्वींना मागील सात वर्षापासून कडक परीक्षा देऊन अखेर काल तिच्या जीवन उद्धाराच्या परीक्षेत ती पास झाली आणि काल रविवारी दिनांक २८ एप्रिल रोजी सकाळी १०:०० वाजता अंजली यांचा जैन भागवती दीक्षा महोत्सव सोहळा संपन्न झाला. अंजली यांनी संसाराचा त्याग करून संयमाच्या मार्गाला अंगीकृत केले आणि त्यांचे नाव महासाध्वी प.पू.संप्रज्ञाजी म.सा. असे नामकरण करण्यात आले व जैन साध्वींचा वेश धारण करून संसाराच्या वेशाचा परित्याग केला. यावेळी प.पू.अक्षयऋषीजी म.सा. यांनी अंजलीला दीक्षा चे मंत्र सुनावले. या दीक्षा महोत्सवासाठी महासाध्वी प.पू.प्रतिभाजी म.सा., प.पू.प्रफुल्लाजी म.सा.,प.पू.सिद्धीसुधाजी म.सा.,प.पू.उदिताजी म.सा.,प.पू. पुण्यस्मिताजी म.सा., आदी ठाणा १६ व प.पू.अक्षयऋषीजी म.सा., प.पू.सौरवमुनीजी म.सा., प.पू.गौरवमुनीजी म.सा.,प.पू.शालिभद्रजी म.सा. आदी ठाणा ९ साधू असे एकूण २५ संत उपस्थित होते. तसेच या दीक्षा महोत्सवासाठी देशभरातून विविध राज्यातून मोठ्या प्रमाणात भक्त आलेले होते. हा सोहळा दिमाखात पार पाडण्यासाठी श्री सकल वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ माजलगाव येथील पुरुष, महिला, मुली, युवक या सर्वांनी मागील पाच महिन्यांपासून अथक परिश्रम घेतले व सोहळा यशस्वीरित्या संपन्न करून दाखविला.



**पत्रकारांचे व पोलिसांचे मोलाचे योगदान**

माजलगावातील सर्व पत्रकार बंधूंनी दीक्षा महोत्सव कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देऊन कार्यक्रमात जास्तीत जास्त संख्येने उपस्थिती दर्शवली तसेच पोलिसांनी मागील पाच दिवसांपासून सुरू असलेल्या कार्यक्रमास व्यवस्थित रित्या परवानगी व बंदोबस्त देऊन सहकार्य केले याबद्दल प.पू.गौरवमुनीजी म.सा.यांनी सर्व पत्रकारांचे व पोलिस बांधवांचे संपन्न झालेल्या जैन भागवती दीक्षा महोत्सवात मोलाचे योगदान असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले व त्यांचे आभार मानले.

## जी फॉर्मच्या नावाखाली आरटीओ कार्यालयात आर्थिक लुट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील सहायक परिवहन कार्यालयात( आरटीओ) विविध कामांसाठी जि फॉर्मच्या नावाखाली नागरिकांची आर्थिक लुट सुरु आहे. ही आर्थिक लुट तात्काळ थांबविण्याची मागणी होत आहे. निवडणूका असल्याने सर्व पुढारी, कार्यकर्ते कामात व्यस्त असल्याने कार्यालयाने ही लुट सुरु केली आहे.


येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात दररोज हजारो वाहनधारक लर्निंग लायसन, नंबर पासिंग, बॅच, वाहनाचे फिटनेस, परमीट, आदी कामांसाठी या कार्यालयात येत असतात. शासनाच्या वाजवी फिसमधे ही कामे होणे अपेक्षीत असते. परंतु या फिस व्यतीरीक्त ही सदरील कार्यालयात अधीकची रक्कम मोजावी लागते. येथील कर्मचाऱ्यांनी याबाबत एक कोडवर्ड ठेवला आहे. ज्याला जी फॉर्म असे गोंडस नाव देण्यात आले आहे. त्याची रक्कम तीनशे रुपयापासुन ३ हजार रुपयापर्यंत कामा नुसार असते. ही रकमेची देवाणघेवाण सर्रासपणे या कार्यालयात होते. त्यामुळे येथे काम घेऊन जाणाऱ्या नागरिकांना या लुटीचा प्रचंड त्रास होत आहे. तरी ही लुट तात्काळ थांबविण्यात यावी अशी मागणी नागरीकांतून होत आहे.




कार्यालयात अशा पध्दतीने कोणी लुट करीत असले तर त्याच्यावर कडक कार्यवाही करण्यात येईल. कार्यालयाच्या कोणत्याही कामा बाबत नागरीकांना अडचण येत असतील तर मला प्रत्यक्ष येऊन भेटावे.

-शेखर आचार्य (वाहन निरीक्षक, आरटीओ कार्यायल अंबाजोगाई)

## फुले नगर घाणीच्या विळख्यात नगर परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथील फुले नगर प्रभाग क्रमांक ०६ या भागात नालीचे पाणी रोड वर येऊन निष्पाप नागरिकांना होतोय त्रास. स्थानिक नागरिकाकडून संताप व्यक्त. नगर परिषद प्रशासन हे आमच्या आरोग्याची खेळत आहे का असा प्रश्न परिसरातील नागरिक विचारत आहेत. लवकरात लवकर ह्या रोगराई च्या विळख्यातुत आम्हाला बाहेर काढा असे नागरिक म्हणत आहेत.

## अंबाजोगाई तालुक्यात चाराटंचाईने दुग्ध व्यवसायावर संकट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सततच्या दुष्काळामुळे अंबाजोगाई तालुक्यात यंदा जनावरांच्या चाऱ्याची टंचाई निर्माण झाली आहे. जनावरांना हिरवा चारा मिळत नसल्यामुळे पशुपालकांना दोन हजार ते तीन हजार रुपये या दराने जनावरांच्या चाऱ्याची खरेदी करावी लागत आहे. यासोबतच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होत चालला आहे.

अंबाजोगाई तालुक्यात काही वर्षांपासून सतत दुष्काळजन्य परिस्थिती आहे. सातत्याने जाणावणारी पाणीटंचाई, पशुखाद्य तसेच चाऱ्यांचे वाढलेले भाव, शासनाच्या विविध योजना गावपातळीवर न पोचणे आदी कारणांमुळे जनावरांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. एकेकाळी मोठ्या संख्येने दिसणारे पाळीव प्राण्यांचे गोठे आता दिवसेंदिवस कमी होत आहेत. परिणामी जनावरे राखणाऱ्या शेतकऱ्यांवरही दुष्काळाची कुऱ्हाड कोसळली आहे. ग्रामीण भागात गाय, म्हैस, बैल, शेळ्यांसह इतर पाळीव प्राण्यांची संख्या मोठी होती. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून अनेक शेतकऱ्यांनी गायी - म्हशी पाळल्या होत्या. दुष्काळावर मात करत अनेकांनी पशुपालन व दुग्ध व्यवसाय सुरू केला होता. मात्र, दुष्काळी परिस्थिती असल्याने शेतकऱ्यांना हिरवा चारा मिळणे कठीण झाले आहे. त्याचा परिणाम दुग्ध व्यवसायावर झाला आहे. दुग्ध व्यवसायातून अनेकांना रोजगार मिळतो. परंतु, आता हा व्यवसायही धोक्यात आला आहे. पूर्वी चांगला पाऊस पडत असल्याने गुरांसाठी हिरवा चारा मिळत होता. उसाच्या चाऱ्यांच्या पेंडीचे भावही सामान्य शेतकऱ्यांना परवडणारे होते. पाच ते दहा रुपयांत हिरव्यागार लुसलुशीत गवाताचा भारा मिळत होता. परंतु काही वर्षांपासून पाणीसमस्या उद्भवत असल्यामुळे चाराटंचाई निर्माण होत आहे. अशावेळी महागाईमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना हिरवा चारा परवडत नसल्याची स्थिती आहे. शेतकरी आधीच कर्जबाजारी असल्यामुळे आणि त्यातही शेतीला पुरेसे पाणी मिळत नसेल तर, जनावरांची निगा कशी राखायची, असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला आहे. दुष्काळजन्य स्थितीत जनावरे सांभाळणे शेतकऱ्यांना परवडणारे नसल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडले आहेत. यावर्षी चांगला पाऊस झाल्यास किमान पुढच्या वर्षीतरी चाराटंचाई भासणार नाही, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा आहे.



### चारा उपलब्ध करून द्यावा

आमच्याकडे दुधाळ गायी म्हशी आहेत. यंदा या दुष्काळामुळे तीव्र चाराटंचाईही जाणवत आहे. चाऱ्याचे भाव गगनाला भिडले असून, हिरवा मका साडेचार ते पाच हजार प्रति दराने खरेदी करून जनावरांचा सांभाळ करावा लागत आहे. एप्रिल महिना अर्धा संपला असून हिरवा चारा उपलब्ध नाही. त्यामुळे चारा दहा ते बारा किलोमीटर अंतरावरील दुसऱ्या शिवरातून आणावा लागत आहे. ही जनावरे सांभाळायची कशी, असा मोठा प्रश्न पडला आहे. शासनाने पाऊस पडेपर्यंत चारा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

### तलावातून सर्रास पाणी उपसा

यावर्षी अपुऱ्या पावसामुळे पाणी टंचाई जाणवत आहे. ग्रामीण भागात असलेल्या तलावमध्ये अवैधरीत्या मोटारी टाकून पाणी उपसा सुरु आहे. यामुळे जनावरांना पाणी पाजण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या अडचणी येत आहे. ग्रामीण भागात तहसीलदार विलास तरंगे यांच्या दुर्लक्षामुळे ग्रामीण भागातील पाझर तलावामध्ये खुलेआम पाण्याच्या मोटरी टाकून पाणी उपासा होत आहे. यामुळे मुक्या जनावरांना पिण्यास पाणी मिळत नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

## डॉ.विठ्ठल जाधव यांच्या 'अटर का पटर' कवितासंग्रहास पुरस्कार

### पुणे येथे राज्यस्तरीय साहित्य पुरस्काराचे वितरण

शिरूर । प्रतिनिधी

प्रसिद्ध बालसाहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'अटर का पटर' या बालकविता संग्रहास पुणे येथील चैत्रपालवी काव्य मंच संस्थेच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे.


पांढरा कावळा(कादंबरी), गर्भकळा (कवितासंग्रह), तिवढा (कथासंग्रह), मानवता व्हाउचर (लेखसंग्रह), बटाटीची धार (कथासंग्रह), उंदरीन सुंदरीन(बालकविता) अशा अनेक पुस्तकांचे वाङ्मयप्रकारांतून डॉ. विठ्ठल जाधव यांनी लेखन केले आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि वाचन चळवळीत महत्वाचे योगदान त्यांनी दिले आहे. महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय साने गुरुजी उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार 'पांढरा कावळा' या कादंबरीस प्राप्त आहे. बाल वाचक केंद्रस्थानी ठेवून 'अटर का पटर' या बालकविता संग्रहाची निर्मिती झाली असून संस्कारक्षम, देशभक्तीपर, बालसुलभ कवितांचा त्यात समावेश आहे. चैत्रपालवी काव्य मंचच्या वतीने राज्यस्तरीय काव्य गौरव पुरस्काराने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस आणि जेष्ठ साहित्यिक बबन पोतदार यांचे हस्ते एस.एम.जोशी सभागृह, पुणे येथे ता. ५ मे रोजी सन्मानित करण्यात येईल असे चंद्रकांत जोगदंड यांनी कळविले आहे.



दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

सोमवार, दि. २९ एप्रिल २०२४ | ६



# जातीय रंग देणाऱ्यांना विकासाची जात दाखवा -पंकजाताई मुंडे यांनी बुथप्रमुखांना केले चार्ज

## गेवराईत भाजपा बुथप्रमुखांची ताकद : स्व. मुंडे साहेबांनी खूप प्रेम दिलेय, त्या उपकाराची परतफेड करूया -आमदार पवार





**गेवराई | प्रतिनिधी**

विकास आणि विश्वास हेच आमचे नाते राहीले असून, स्व. मुंडे साहेबांनी जातीची गणिती मांडून राजकारण केले नाही. मात्र, सध्या बीड जिल्ह्यातील शरद पवारांची राष्ट्रवादी अपप्रचार, बुद्धीभेद करून, दोन समाजात तेढ निर्माण करीत आहेत. परंतू , बीड जिल्ह्यातील मायबाप जनतेने जातीय रंग देणाऱ्यांना धडा शिकवून, विकासाची जात बघून मतदान करून,मला एक संधी द्यावी, असे आवाहन बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी येथे बोलताना केले.

दरम्यान, कामा मुळे लक्षात राहीले पाहिजे. मुंडे साहेबांवर गेवराई ने खूप प्रेम केलय. पालकमंत्री असताना उतराई होण्याचा प्रयत्न मी केलाय. आमदार लक्ष्मण पवार यांचा शब्द कधी पडू दिला नाही. असे सांगून, पंकजा मुंडे यांनी शक्ती प्रमुखांचा क्लास घेऊन कार्यकर्त्यांना केले जबरदस्त ''चार्ज'' केले. थेट दुहेरी संवाद साधून पंकजा मुंडे यांनी बैठकीचा मूड चेंज केला. तर, आमदार लक्ष्मण पवार यांनी अभ्यासपूर्ण भाषण करून, मतदारसंघाचा आढावा घेतला. स्व. मुंडे, पंकजाताई मुंडे यांनी भरभरून दिलय, हे प्रमाणीकपणे कबूल करून, आता आपला धर्म इमानदारीने पाळुन ताईंना दिल्लीत पाठवा, असे आवाहन आमदार. पवार यांनी केले. बीड लोकसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्ष व महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ , गेवराई शहरात रविवार ता. २८ रोजी दु. २ वाजता,गेवराई विधानसभा मतदारसंघातील सुपर वारियर्स, शक्तीकेंद्र प्रमुख, बुथप्रमुखासह प्रमुख पदाधिकाऱ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर आ.लक्ष्मण पवार, संघटनमंत्री संजय कौडगे, भाजप नेते मोहनराव जगताप, भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, ॲड.सुरेश हात्ते, जे.डी. शहा, शिवसेना तालुका प्रमुख शिनुभाऊ बेदरे, सतीश पाटील, युवानेते शिवराज पवार, म.न.से. अध्यक्ष जयदीप गोल्हार, भाजपा अध्यक्षा रत्नमाला मोटे, भगवान घुबार्डे, नगराध्यक्ष सुशिल जवंजाळ, ब्रम्हदेव धुरंधरे, उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, राहुल खंडागळे,दादासाहेब गिरी, मधुकर वादे, याहयां खान, प्रा. कुंड यांची उपस्थिती होती.

पंकजाताई मुंडे या वेळी बोलताना म्हणाल्या की, भाजपाची खरी ताकद बुथ प्रमुख, वॉरियर्स ,शक्ती प्रमुख आणि पक्षाचे कार्यकर्ते आहेत. तुम्ही, गावात जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व्हिजन, त्यांची यशस्वी दहा वर्ष, केलेली लोकोपयोगी कामे सांगायची आहेत. विकास आणि विश्वास हेच आपले नाते आहे. जातीय तेढ निर्माण करणारांना थारा देऊ नका, आपण कधीही जातीच्या आधारावर मते मागीतली नाहीत. हा आपला, तो परका, असा भेद कधीही केला नाही. स्व. मुंडे साहेबांनी, खासदार प्रितमताई आणि मी, आम्ही इमानदारीने काम केलय. पालकमंत्री म्हणून काम करत असताना आमदारांना भरपूर निधी दिला. आमदार लक्ष्मण आण्णांनी मागीतला तेवढे निधी दिला म्हणून गेवराई मतदारसंघात आज आण्णांच्या माध्यमातून झालेला विकास दिसतोय. एक संधी द्या, बीड चा खासदार म्हणून तुम्हाला अभिमान वाटेल असे काम करीन, असा विश्वास ही पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त करून, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कुशल नेतृत्वाखाली बीड विकास करण्यासाठी मला निवडून द्या, असे आवाहन ही पंकजाताई यांनी शेवटी बोलताना केले.आमदार पवार म्हणाले, मोदीजी, स्व. मुंडे आणि पंकजाताई यांनी जी कामे केली. त्या कामाचे मूल्यमापन करण्याची गरज निर्माण झाली असून, गेवराई मतदारसंघात जो विकास झालाय, तो ताईंच्या मदतीने झालाय. म्हणून, बीडचा खासदार ताई च्या रूपाने मोठ्या मताधिक्याने निवडून द्या, असे आवाहन आमदार पवार यांनी केले. भाजपाचा कणा हा कार्यकर्त्या आहे. गेवराई मतदारसंघात नदीजोड प्रकल्प, सिंधफणेत पाणी आणायची ताकद खंबीर नेतृत्व म्हणून पंकजाताई यांच्यात आहे. गेवराई मतदारसंघाला ताईनी पालकमंत्री म्हणून खूप मदत केली. आता परतफेड करायची वेळ आलीय, स्व. मुंडे साहेबांनी आणि ताईनी गेवराई मतदारसंघातील लोकांवर खूप प्रेम केलय, त्या उपकाराची परतफेड करून बीड जिल्ह्यात नवा इतिहास करा आणि सर्वाधिक मताधिक्य गेवराई मतदारसंघातून द्या, असे आवाहन ही शेवटी आमदार लक्ष्मण पवार यांनी केले. यावेळी मोहनराव जगताप, राजेंद्र मस्के, ॲड. सुरेश हात्ते यांची भाषणे झाले. ज्येष्ठ पत्रकार जेडी शहा यांनी पंकजा मुंडे बीड लोकसभेत, बीड ची लक्ष्मी म्हणून प्रवेश करतील, त्यांना आशीर्वाद द्या, असे आवाहन केले. संचलन पत्रकार सुशिल टकले यांनी केले. कार्यक्रमास भाजपाचे बुथप्रमुख, सुपरवारियर्स, शक्तीकेंद्र प्रमुख, पदाधिकाऱ्यांसह नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते आभार ऑ.उध्दव रासकर यांनी व्यक्त केले.

# पंकजाताईंना मत म्हणजे विकासाला मत -राजकिशोर मोदी



**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना मत म्हणजे विकासाला मत अशी स्पष्टोक्ती अंबाजोगाई नगरीचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केली. ते महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आघाडी धर्म निभावत अंबाजोगाई शहरात प्रचारफेरीच्या शुभारंभ प्रसंगी बोलत होते. यावेळी राजकिशोर मोदी यांच्यासह माजी आमदार संजय दौंड, माजी उपनगराध्यक्ष बबन लोमटे, तानाजी देशमुख, मनोज लखेरा, किशोर परदेशी, महादेव आदमाणे, अमोल लोमटे, धम्मा सरवदे, सुनील व्यवहारे, दिनेश भराडीया, कमलाकर कोपले, दिलीप काळे, अनंत लोमटे, प्रवीण जयभाय, खालेद चाउस,गणेश मसने, सुनील वाघाळकर,काझी खयामोद्दीन, मतीन जरगर,दत्ता सरवदे,खलील जाफरी,सचिन जाधव,बबन पानकोळी, चंद्रकांत महामुनी, सुधाकर टेकाळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

या प्रचारफेरीस प्रशांत नगर,अंबिका सोसायटी,विद्याकुंज कॉलनी,बन्सीलाल नगर, शिक्षक कॉलनी, हनुमान नगर,मंगळवार पेठ, हनुमान नगर, परिसरातील नागरिकांनी संवाद साधतांना उदंड असा प्रतिसाद दिला. प्रचारफेरी दरम्यान बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असतांना पंकजा मुंडे यांनी जिल्ह्यासाठी राबविण्यात आलेल्या विकास कामांची आठवण नागरिकांना करवून दिली. त्यांनी सर्व जातीधर्माच्या लोकांना सोबत किंवा विचारात घेऊनच जिल्ह्याबरोबरच राज्याचे नेतृत्व केले असल्याचे राजकिशोर मोदी यांनी मतदारांना पटवून दिले. यापुढेही त्या अशीच विकासाची कास धरून सामान्य माणसाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करतील अशी ग्वाही देखील मोदी यांनी प्रचारादरम्यान नागरिकांना पंकजा मुंडे यांच्या वतीने दिली. तेव्हा मतदारांनी आपले आशीर्वाद रुपी मतदान पंकजा मुंडे यांच्या झोळीत भरभरून टाकावे असे आवाहन याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी केले. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ना अजितदादा पवार तसेच राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिह्यात महायुतीच्या नीती व धोरणानुसार संपूर्ण जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात लोकसभा निवडणुकीच्या प्रचाचाराची रणधुमाळी अतिशय जोमाने सुरू आहे. प्रत्येक जिल्हा, तालुका त्याचबरोबर ग्राम पातळीवर प्रत्येक पक्ष आपापल्या पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार अतिशय तळमळीने करतांना दिसून येत आहे. महायुतीच्या जाहिरनाम्यानुसार यापुढे विकास कामाची गंगा आपल्या जिल्ह्यात आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करू असे आश्वासन ना धनंजय मुंडे, पंकजा मुंडे यांच्या वतीने राजकिशोर मोदी हे नागरिकांना देत आहेत. आज या प्रचारफेरीस विष्णू पांचाळ, माणिक वडवनकर , रफिक गवळी, जावेद गवळी, शरद काळे, महेश कदम, सुशील जोशी, सुदाम देवकर, उज्जेन बनसोडे,सुगत सरवदे,अस्लम शेख, भारत जोगदंड,शुभम लखेरा यांच्यासह शेकडो कार्यकर्ते पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारात सहभागी झाले होते.

# राज्यात सरकार आल्यास ऊसतोड महामंडळाचा अध्यक्ष हा बंजारा समाजाचा असेल -बजरंग सोनवणे

## गेवराईच्या मेळाव्यात बंजारा समाजाचा बजरंग सोनवणे यांना पाठिंबा



**बीड / गेवराई | प्रतिनिधी**

आम्ही बंजारा समाजाच्या सदैव पाठीशी आहोत. राज्यात इंडियाआघाडीचे सरकार आल्यास ऊसतोड महामंडळाचे अध्यक्षपद देखील बंजारा समाजाच्या व्यक्तीला देवू. तसेच जिल्हा परिषद, पंचायत समितीध्ये बंजारा समाजाला प्रतिनिधित्व देवून त्यांचा सन्मान राखला जाईल. असे आश्वासन बजरंग सोनवणे यांनी दिले.

गेवराई शहरातील बेदरे लॉन्स येथे बंजारा समाजाचा राष्ट्रवादी काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना जाहीर पाठिंबा देण्यासाठी महानायक ग्रुपच्या वतीने संस्थापक अध्यक्ष भगवान राठोड यांनी बंजारा समाजाच्या वतीने मेळावा आयोजित करून शक्ती प्रदर्शन केले. यावेळी उमेदवार बजरंग सोनवणे हे बोलत होते. मेळाव्यास युवा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष महबूब शेख, माजी आमदार बदामराव पंडित, पक्षाचे जिल्हाध्यक्ष आमदार संदीप शिरसागर, युवा नेते युद्धजीत पंडित, राष्ट्रवादी किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पूजा मोरे, उद्योजक पानसंबळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

या मेळाव्यात बंजारा समाजाच्या कार्यकर्त्यांनी भाजप सरकार व त्यांच्या नेत्यांचा धडा शिकवायचा असेल तर या लोकसभेच्या निवडणुकीत भाजप उमेदवाराचा पराभव करणे आवश्यक आहे. बंजारा समाज हा सेवालाल महाराज आणि स्व. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या विचाराचे पाईक असून ते आमच्या समाजाचे आदर्श आहेत असे सांगितले. मेळाव्यास महानायक ग्रुपचे भगवान राठोड आणि त्यांचे संस्थापक भगवान राठोड आणि त्यांचे सहकारी जायकोबा राठोड, शरद पवार, संजय पवार सुनील चव्हाण यांच्यासह गेवराई आणि माजलगाव तालुक्यातील बंजारा बांधव व तरुण उपस्थित होते. दरम्यान, बंजारा समाजाचा बजरंग बप्पा सोनवणे यांना पाठिंबा दिला असल्याने भाजप आणि त्यांच्या उमेदवाराच्या पायाखालची वाळू ◀◀ पान ३ वर

# डॉ.आंबेडकर जयंती महोत्सवास भेटी देत अशोक हिंगे यांनी साधला मतदारांशी संवाद



**अशोक हिंगे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचा मतदारांचा निर्धार**

**बीड | प्रतिनिधी**

बीड लोकसभेचे वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी काल केज तालुक्यातील विविध ठिकाणच्या आंबेडकर जयंती महोत्सवास भेटी देत मतदारांशी संवाद साधला यावेळी मतदारांनी हिंगे यांना मोठ्या मताधिक्याने विजय करून संसदेत पाठवण्याचा निर्धार व्यक्त केला

वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या नियोजनबद्ध प्रचाराने महायुती महाविकास आघाडी च्या उमेदवाराना धडकी भरली असून अशोक हिंगे पाटील यांना प्रत्येक गावातून जातीभेद विसरून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे महायुती, महाविकास आघाडीचे उमेदवार हे जातीपातीचे राजकारण करत आहेत हे सुज्ञ मतदारांनी ओळखले आणि पुरोगामी महाराष्ट्रात जातीच्या राजकारणला थारा नाही म्हणून महायुती महाविकास आघाडीच्या उमेदवाराला घरी बसऊन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना मोठ्या मताधिक्याने विजय करून संसदेत पाठवायचेच असा निर्धार प्रत्येक गाव ◀◀ पान ३ वर

# 'जातीपातीचे पाहण्यापेक्षा,जिल्ह्याच्या मातीला विकासाचे वैभव द्या'





**बीड | प्रतिनिधी**

विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. जातीपातीच्या राजकारणामुळे विकास कामात खीळ बसते. आणि हाती आलेला विकास कोसो दूर जातो. मुंडे साहेबांच्या जाण्याने विकासाचा प्रचंड अनुशेष जिल्ह्यात निर्माण झाला. आणि हा अनुशेष भरून काढण्यासाठी माझी उमेदवारी ही सुवर्णसंधी आली आहे. त्यामुळे कोणताही कलुषित भाव समाजाने न ठेवता विकासाचे ध्येय गाठण्यासाठी प्रत्येक समाजाने पुढे येऊन मतदान करावे. कोणत्याही अफवा आणि द्वेषाला बळी न पडता जातीपातीचे पाहण्यापेक्षा जिल्ह्याच्या मातीला विकासाचे वैभव देण्यासाठी कमळ चिन्हावर मतदान करून मला सन्मानपूर्वक संसदेत पाठवा. असे आवाहन भाजपा महायुतीचे उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी ताडसोन्ना येथे बैठकीदरम्यान केले.

भाजपा महायुतीचे लोकप्रीय उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे थेट गाव खेड्यात जाऊन मतदारांशी संवाद साधत आहेत. भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली रात्री पालवण नंतर ताडसोन्ना ग्रामस्थांशी बैठक घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. रात्रीचे साडेबारा वाजले तरीसुद्धा मतदार बांधवांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, सर्जेराव तांदळे, सोमनाथ दादा माने, बालासाहेब मुंडे, मनोज काका पाटील, विठ्ठल नाना शिंदे, वचीष्ठ मुंडे, संजय मुंडे, सोमनाथ वाडमारे,फिरोज सय्यद,नवनाथ मुंडे, सिताराम मुंडे, समीर सय्यद, सुरेश माने, विनायक मुंडे, गोरख मुंडे, अंबादास मुंडे, सद्दाम शेख, अच्युत मुंडे, कल्याण मुंडे, आत्माराम मुंडे, निसार सय्यद, गफार शेख, आसाराम मिसाळ, जमीर शेख, यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते.

# आपले प्रश्न मांडण्यासाठी आपला माणूस दिल्लीला पाठवावा लागेल-आ.संदीप क्षीरसागर

**रायमोह, खालापुरीत प्रचारासाठी कॉर्नर सभा**



**बीड | प्रतिनिधी**

आपले प्रश्न शासनदरबारी मांडण्यासाठी आणि त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी आपल्या प्रश्नांची जाण असलेला माणूस आपल्याला खासदार म्हणून दिल्लीला पाठवावा लागेल. त्यासाठी इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना निवडून द्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले.

शिरूर कासार तालुक्यातील राममोह व खालापुरी याठिकाणी आ.संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ कॉर्नर सभा घेतली. यावेळी, आपल्या प्रश्नांची आणि समस्यांची जाण असलेला माणूस आपल्याला खासदार म्हणून दिल्लीत पाठवावा लागेल. आपला खासदार हा आपले प्रश्न जाणणारा, तो शासनदरबारी मांडणारा आणि त्याचा पाठपुरावा करणारा असला पाहिजे. आणि असा चेहरा आपल्याकडे ◀◀ पान ३ वर

# जगतापांचे जयंत पाटील यांच्यावरील आरोप बिनबुडाचे -सुरेशराव शिंदे

**सांगली | प्रतिनिधी**



सांगली लोकसभेची जागा शिवसेनेला देताना काँग्रेसची नेतेमंडळी टाळ घेऊन बसले होते की काय? असा सवाल करून जागा आबाधित न राखता येणाऱ्या काँग्रेसवर आरोप न करता राष्ट्रवादीचे नेते तथा प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यावर माजी आमदार विलासराव जगताप यांनी बिनबुडाचे आरोप करू नयेत. अन्यथा जशास तसे उत्तर देणार असल्याचा इशारा सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते सुरेशराव शिंदे यांनी दिला.

जत तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (शरद पवार गट) वतीने आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी तालुकाध्यक्ष मन्सूर खतीब, उत्तम चव्हाण, शफीक इनामदार, आप्पासो पवार, शिवाजी शिंदे, बाजी केंगार आदी उपस्थित होते. सुरेशराव शिंदे म्हणाले की, सांगली लोकसभेची जागा ही काँग्रेस आणि शिवसेना यांनी मागितली होती. त्यामुळे राष्ट्रवादी ◀◀ पान ३ वर

# चंद्रहार पाटील यांच्या प्रचारात विश्वजीत कदम सक्रिय

**सांगली | प्रतिनिधी**

सांगली लोकसभा मतदारसंघात मागच्या निवडणुकीप्रमाणे यंदाही तिरंगी सामना रंगणार आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपात हा मतदारसंघ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाला सुटल्याने काँग्रेस नेते विशाल पाटील यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सांगली जिल्ह्यातील काँग्रेसचे मातब्बर नेते आणि सांगलीची जागा मविआच्या जागावाटपात काँग्रेसला मिळावी, यासाठी तब्बल तीन महिने प्रचंड धावपळ करणारे आमदार विश्वजीत कदम हे आता काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र कदम यांनी आता आपली भूमिका स्पष्ट करत मविआ उमेदवार चंद्रहार पाटील यांच्या प्रचारात सक्रिय होण्याचा निर्णय घेतला आहे. चंद्रहार पाटील यांच्या प्रचारानिमित्त विश्वजीत कदम हे आमदार असलेल्या पलूस तालुक्यात नुकतीच एक बैठक पार पडली.



विश्वजीत कदम हे चंद्रहार पाटील यांच्या प्रचारात सक्रिय झाल्याने विशाल पाटील यांना मोठा धक्का बसला आहे. कारण कदम यांची पलूस-कडेगावसह संपूर्ण सांगली जिल्ह्यात चांगली ताकद आहे. पलुस इथे झालेल्या बैठकीविषयी स्वत: चंद्रहार पाटील यांनी आपल्या फेसबुक पेजवरून माहिति दिली आहे. आज ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# साडेसोळाशे मतदार करणार टपाली मतदान



**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यात पहिल्यांदाच ८५ वर्षांवरील ज्येष्ठ, दिव्यांग नागरिक तसेच अत्यावश्यक सेवेतील अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. जिल्ह्यातील एक हजार ६७५ मतदारांनी या सुविधेसाठी अर्ज केल्याची माहिती जिल्हा निवडणूक प्रशासनाने दिली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार टपाली मतदान करू इच्छिणार्या ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिकांच्या घरी जाऊन मतदान केंद्रस्तरीय अधिकार्यांनी १२ डी भरून घेण्यात आले होते.

तसेच, अधिसूचित अत्यावश्यक सेवेतील १२ डी अर्ज भरून दिलेल्या अधिकारी, कर्मचार्यांनाही ही सुविधा देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील चारही मतदारसंघांत मिळून ८५ वर्षांवरील एक हजार ३९७ आणि २६५ दिव्यांग मतदारांनी १२ डी अर्ज भरून दिला असून, त्यांना घरून मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. तर अत्यावश्यक सेवेतील १३ मतदारांनी १२ डी नमुना भरून सहायक निवडणूक निर्णय अधिकार्यांच्या कार्यालयात टपाली मतदान सुविधा केंद्रात (पीव्हीसी) जाऊन टपाली मतदानाची इच्छा व्यक्त केली आहे.

पुणे लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक ४६३ इतक्या ८५ वर्षांवरील ज्येष्ठ मतदारांनी टपाली मतदानाचे अर्ज भरून दिले आहेत. या मतदारसंघात ४२ दिव्यांग मतदारांनी, बारामती लोकसभा मतदारसंघात २९० ज्येष्ठ मतदार, तर ९१ दिव्यांग मतदारांनी १२ डी अर्ज भरून दिले आहेत. शिरूरमध्ये ३९१ ज्येष्ठ मतदार, ८७ दिव्यांग मतदार आणि अत्यावश्यक सेवेतील १० मतदारांनी १२ डी अर्ज भरून दिले आहेत. मावळ मतदारसंघात ८५ वर्षांवरील २६३ ज्येष्ठ मतदार, ४५ दिव्यांग तर अत्यावश्यक सेवेतील तीन मतदारांनी टपाली मतदानाचे अर्ज भरून दिले आहेत.

**घरी जाऊन मतपत्रिकेवर मत नोंदविले जाणार**

संबंधित मतदारसंघातील मतदानाच्या दिवशी ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग नागरिकांच्या घरी प्रत्यक्ष जाऊन मतपत्रिकेवर मत नोंदवून घेण्यात येणार आहे. अत्यावश्यक सेवेतील १२ डी अर्ज भरून दिलेल्या अधिकारी, कर्मचार्यांना त्या त्या मतदारसंघासाठी निश्चित केलेल्या तारखांना सहायक निवडणूक निर्णय अधिकार्यांच्या कार्यालयात टपाली मतदान सुविधा केंद्रात (पीव्हीसी) जाऊन टपाली मतदान करता येणार आहे.

# ..तर संपूर्ण कुटुंब प्रचारात उतरविण्याची वेळ आली नसती : रूपाली चाकणकरांचे विधान चर्चेत

**पुणे । प्रतिनिधी**



खासदार म्हणून केवळ 'संसदरत्न' पुरस्कार मिळविण्यापेक्षा पंधरा वर्षांत सर्वसामान्यांच्या हिताची कामे केली असती तर आज प्रचारासाठी संपूर्ण कुटुंब उतरविण्याची वेळ आली नसती. आणखी कोणी लहानसहान व्यक्ती राहिली असेल तर तीही प्रचारात उतरवा, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी खासदार सुप्रिया सुळे यांना लगावला. भाजप शहर कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत चाकणकर बोलत होत्या. सुप्रिया सुळे यांची कन्या रेवती सुळे याही प्रचारात उतरल्याच्या प्रश्नाचे उत्तर देताना चाकणकर यांनी सुप्रिया सुळे यांच्यावर टीका केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निधी आणून केलेली कामे सांगून सुळे यांच्याकडून कामांवर डल्ला मारला जात असल्याचाही आरोप केला. महाविकास आघाडीत असताना महागाईविरोधात आंदोलन करणार्या चाकणकर यांनी केंद्र सरकारच्या योजनांचे गुणगान गायले. त्याचवेळी स्वयंपाकाच्या गॅससिलिंडरचे भाव कमी झाले पाहिजेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच केंद्र सरकार आणि राज्य सरकारने महिलांसाठी राबविलेल्या योजनांचा पाढा वाचला. मणिपूरच्या घटनेची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दखल घेतली नाही. त्यामुळे त्या वेळीही आम्ही निषेध केला आणि आजही निषेध करतो, असेही चाकणकर म्हणाल्या.

# पीसीसीओई मध्ये राज्यस्तरीय नेटबॉल स्पर्धेला प्रारंभ

## महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील २५ पुरुष संघ व २० महिला संघांचा सहभाग

**पिंपरी, पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र अँमॅच्युअर नेटबॉल संघटनेच्या मान्यतेने, पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय, निगडी, पुणे जिल्हा नेटबॉल संघटना व विठ्ठलशेठ सोमाजी काळभोर चॅरिटेबल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने २७ ते २९ एप्रिल या कालावधीत १७ वी वरीष्ठ गट (पुरुष व महिला) राज्यस्तरीय नेटबॉल स्पर्धेचे आयोजन पीसीसीओई मैदानावर करण्यात आले आहे. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील २५ पुरुष संघ व २० महिला संघानी सहभाग नोंदविला आहे.

स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र अँमॅच्युअर नेटबॉल संघटनेचे सचिव डॉ. ललित जीवानी, पुणे जिल्हा नेटबॉल संघटनेचे सचिव मानसिंग वाबळे, विठ्ठलशेठ सोमाजी काळभोर चॅरिटेबल फाउंडेशनचे अध्यक्ष हरिश्चंद्र काळभोर,



सचिव गोरख भालेकर, कोषाध्यक्ष चेतन काळभोर, साहिर सिकीलकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रथमच पीसीसीओईला राज्यस्तरीय स्पर्धा आयोजनाचा मान मिळाला आहे. स्पर्धा साखळी व बाद पद्धतीत होणार आहेत. पहिल्या दिवशीच्या साखळी सामन्यात पुणे, गोंदिया, शाहूनगर, भंडारा पुरुष संघानी पाहिले सामने जिंकून पुढे आगेकूच केली. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी राज्यस्तरीय नेटबॉल स्पर्धेसाठी आयोजकांना आणि खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन व स्पर्धेचे आयोजन पीसीसीओईचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष पाचारणे यांनी केले.

# 'सुयोग डेव्हलपेंट कॉर्पोरेशन'च्या साईटवर कामगाराचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे-सोलापूर रस्त्यावर असलेल्या कृष्णराव ढोले चौकातील (सेव्हन लव्हज चौक) एका बांधकाम साईटवर कामगाराचा पाचव्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला. ही घटना २४ एप्रिल रोजी दुपारी पावणेदोनच्या सुमारास घडली. याप्रकरणी क्रेन पुरवणार्या ठेकदार कंपनीसह सुपरवायजरवर स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चंद्रा कुबेर पात्रा (वय २०) असे मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांचे नाव आहे. याप्रकरणी ऑरेंज मशीनटेक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मालक व संचालक तसेच सुपरवायजर प्रवीण नाथा कोदर याच्यावर भादवि ३०४ (अ), ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सुरेश दासो पात्रा (वय ३५) यांनी फिर्याद दिली आहे. तपास अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक राहून कोलंबीकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुयोग डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीमार्फत कृष्णराव ढोले चौक (सेव्हन लव्हज चौक) येथे असलेल्या चंदन हॉटेल शेजारील युनिट १२, सर्वे क्रमांक ५१४/ए, ५१३/ए/बी याठिकाणी 'सुयोग नवकार' नावाची बांधकाम साईट सुरू आहे. या साईटवर चंद्रा कुबेर पात्रा हा काम करीत होता.

याठिकाणी लागणाऱ्या क्रेन व तत्सम मशीनरी ऑरेंज मशीनटेक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने पुरवलेले आहेत. या कंपनीचे मालक व संचालक तसेच सुपरवायजर प्रवीण कोदरे यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रा पात्रा हा काम करीत होता. टॉवर क्रेन मशीनला तांत्रिक बिघाड झाला होता. चंद्रा व अन्य तीन मजूर ही टॉवर क्रेन मशीन दुरुस्त करीत होते. त्यांनी ही मशीन खोलली होती. त्याला केबल लावण्याचे काम हे चौघे करीत होते. पार्किंगसाठी बांधण्यात येत असलेल्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावर हे काम सुरू होते. त्यावेळी अचानक चंद्रा याचा तोल गेला. तो पार्किंगच्या पाचव्या मजल्यावरून खाली पडला. त्याच्या मानेला, डोक्याला आणि पायाला गंभीर इजा झाली. त्यातच त्याचा जागीच मृत्यू झाला.

दरम्यान, ठेकेदार व ऑरेंज मशीनटेक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून कामगारांना कोणतेही संरक्षक साहित्य पुरविण्यात आलेले नव्हते. याठिकाणी सुरक्षात्मक उपाययोजना देखील करण्यात आलेल्या नव्हत्या. संरक्षक साहित्याची वारंवार मागणी करून देखील हे साहित्य पुरविण्यात आले नव्हते असे फिर्यादीमध्ये नमूद करण्यात आले आहे. कामगारांच्या जीविताकडे हयगय व अविचाराने दुर्लक्ष केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास सहायक निरीक्षक राहुल कोलंबीकर करीत आहेत.

## मेट्रोमुळे पुणे विद्यापीठ चौकातील वाहतुकीत बदल

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकामधील मेट्रोच्या गर्डर कास्टींगचे काम केले जाणार आहे. तसेच, स्टील गर्डरच्या कामासाठी औंध-बाणेर-पाषाण रस्त्यावरील वाहतुकीत प्रायोगिक तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात बदल करण्यात आले आहेत. हे काम सोमवार आणि मंगळवारी होणार आहे. त्याकरिता वाहतूक शाखेचे उपायुक्त रोहिदास पवार यांनी याबाबतचे आदेश काढले आहेत.

पाषाण रोड - पुणे विद्यापीठ चौक ते अभिमान श्री चौक दरम्यान रस्त्यावरुन सध्या असलेली एकेरी वाहतूक दुहेरी करण्यात आली आहे. यासोबतच, बाणेर रोडवरुन पुणे विद्यापीठ चौकामध्ये प्रवेश बंद करण्यात आला आहे. त्याकरिता बाणेर रोडवरुन पुणे विद्यापीठ चौकमध्ये येणाऱ्या वाहन चालकांनी अभिमान श्री चौक बाणेर रोड येथून उजवीकडे वळण घेऊन अभिमान श्री चौक पाषाण रोडने विद्यापीठ चौकामध्ये यावे व इच्छित स्थळी जावे. तसेच, पुणे विद्यापीठ चौकामधून औंध रोडने जाणाऱ्या वाहन चालकांनी पुणे विद्यापीठ चौकामधून औंध रोडने जावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# समाजमाध्यमात रसिकतेचे स्वातंत्र्य तरी स्पर्शाचे गाणे मात्र अतृप्त : डॉ. आशुतोष जावडेकर

## विपुलश्री मासिकाचा रौप्य महोत्सवी कार्यक्रम साजरा : वासंतिक कथा स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**पुणे । प्रतिनिधी**

समाजमाध्यमांनी नकळतपणे अभिव्यक्तिचे लोकशाहीकरण केले आहे. समाजमाध्यमांचे जग आभासी असले तरी अनेकजण त्यात गुंतून पडतात. भौगोलिक अडसर दूर सारून मध्यस्थाविना रसिकता जोपासण्याचे स्वातंत्र्य यातून मिळत असले तरी स्पर्शाचे गाणे मात्र अतृप्त राहते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध लेखक आणि वक्ते डॉ. आशुतोष जावडेकर यांनी केले.

सुजाण कुटुंबाचा समृद्ध साथीदार हे बिरुद असलेल्या विपुलश्री मासिकाचा रौप्य महोत्सवी कार्यक्रम लेखक, वाचक, हितचिंतक यांच्या उपस्थितीत शैलेश सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले डॉ. जावडेकर यांचे 'तुम्हाला कोण व्हायचंय? व्हॉटसअपकर, इन्स्टाकर की फेसबुककर' या विषयावर व्याख्यान झाले. त्या वेळी त्यांनी




समाजमाध्यमांनी व्यापलेले प्रत्येकाचे आयुष्य, समाजमाध्यमांची उपयुक्तता, त्यातील तोटे यावर मार्मिक विवेचन केले. विपुलश्री मासिकाच्या संपादक माधुरी वैद्य, कथा लेखन स्पर्धेच्या परिक्षक ज्योत्स्ना आफळे व्यासपीठावर होत्या. विपुलश्रीतर्फे घेण्यात आलेल्या वासंतिक कथा स्पर्धेचे, वार्षिक पारितोषिकांचे वितरण तसेच वासंतिक अंकाचे प्रकाशन या वेळी झाले.

सोशल होणे ही प्रत्येकाची मुलभूत वृत्ती असते असे नमूद करून डॉ. जावडेकर म्हणाले, समाजमाध्यमांची जशी उपयुक्तता आहे त्याच प्रमाणे तोटेही आहेत. समाजातील प्रत्येक घटक समाजमाध्यमांवर अभिव्यक्त होत आहे, ही चांगली बाब आहे. आपल्यातील रसिकता जोपासण्याबरोबर इतरांनाही आनंद देण्याचा यातून प्रयत्न केला जातो. समाजमाध्यमांची दुसरी बाजू बघितली तर झटपट प्रसिद्धीची चटक लागते. जगाच्या कानाकोपऱ्यात समाजमाध्यमांद्वारे माहिती क्षणात पोहोचत असली तरी ती कितपत खरी आहे असा प्रश्न पडतो. ते पुढे म्हणाले, समाजमाध्यमांनी आपले आयुष्य जसजसे व्यापले तसतसा परस्परांमधील संवाद कमी झाल्याचे दिसून आले आहे. ज्या काळी भाषा अस्तित्वात नव्हती, त्या काळी चित्रभाषेचा वापर होत होता. समाजमाध्यमांमध्ये इमोजी आले आणि आपल्या प्रचलित भाषेचा संकोच होत गेला. समाजमाध्यमांमधील संवादात चुकीचा इमोजी जर वापरला गेला तर अर्थनिष्पत्ती बदलते. समाजमाध्यमांचा वापर सकारात्मक दृष्टीने कसा करावा याविषयीही त्यांनी विवेचन केले.

प्रास्ताविकात विपुलश्री मासिकाच्या संपादक माधुरी वैद्य यांनी मासिकाच्या २५ वर्षांच्या वाटचालीचा कृतज्ञतापूर्वक आढावा घेतला तसेच या वाटचालीत वेळोवेळी सहकार्य करणाऱ्या लेखक, हितचिंतकांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. विनिता आपटे यांनी केले.

वासंतिक कथा लेखन स्पर्धेतील विजेते

प्रथम - जयंत देशपांडे (गीता गायब)

द्वितीय - मधुकर लोंढे (कोंबाजी रताळं)

तृतीय - डॉ. शुभंकर कुलकर्णी (ऋण)

चतुर्थ - अभय वळसंगकर (कृष्णविवर)

पंचम - शुभदा मित्रगोत्री (अमानत)

उत्तेजनार्थ - रमेश पिंजरकर (वाटणी), मिहीर ठकार (उगवता चंद्र पुनवेचा), रेखा नाबर (मृत्युंजय), शोभा खानविलकर (वेगळी माती), रश्मी पटवर्धन (नात्यांचे बँक खातं), प्रकाश रायकर (बदामाची राणी), दिलीप कुकडे (तिच्या मरणाचा सोहळा).

# जिजाऊंनी पुण्यात सोन्याचा नांगर फिरवून रयतेमध्ये विश्वास निर्माण केला - ह.भ.प. शिरीष महाराज मोरे

**पिंपरी, पुणे । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज नऊ वर्षांचे असताना त्यांच्या हस्ते जिजाऊंनी पुण्यात सोन्याचा नांगर फिरवून रयतेमध्ये पुणे वसवण्यासाठी विश्वास निर्माण केला. ही घटना म्हणजे मोगलांच्या राजवटीतून रयतेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी रचलेला पाया आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे स्वराष्ट्र निर्मितीचा ध्यास घेतलेले, प्रखर राष्ट्रवाद जोपासणारे, सृजनशील व्यक्तिमत्व होते असे हभप शिरीष महाराज मोरे म्हणाले.

चिंचवड गावातील गांधी पेठ तालीम मित्र मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या व्याख्यानमालेत चौथे पुष्प गुंफताना मोरे बोलत होते. जिजाऊ व्याख्यानमालेचे हे ३४ वे वर्ष आहे. यावेळी उद्योजक एस. बी. पाटील, श्रीकृष्ण




**गांधी पेठ तालीम मित्र मंडळाच्या जिजाऊ व्याख्यानमालेचे चौथे पुष्प**

कुलकर्णी, माजी नगरसेवक वसंत शेवडे, तसेच राम साखरे, राजू शिवतरे, संजय कलाटे, संतोष माचूत्रे, नवनाथ तरडे, संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ गोलांडे, व्याख्यानमालेचे समन्वयक सुहास पोफळे, गणेशोत्सव समिती अध्यक्ष विपुल नेवाळे, सदस्य महेश गावडे, धीरज गुत्ते, जगदीश घुले, प्रवीण भोकरे, संदीप जंगम आदी उपस्थित होते.

मोरे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकाला पूर्वी मुघलांचे आक्रमण सुरू होते. यावेळी समाज व समाजाचे नेतृत्व असुरक्षित होते. मंदिरांवर आक्रमणे होत होती. पंढरपूर, काशी, सोरटी सोमनाथ येथील मंदिरांवर आक्रमण करून मूर्तींची विटंबना केली जात होती. आया, बहिणींना पळवून नेऊन गुलाम केले जात होते. निरपराध नागरिकांची हत्या केली जात होती. ही लूट व अन्याय ५०० वर्ष सुरू होते. हे सर्व धर्मांतरासाठी केले जात होते. राजमाता जिजाऊंनी अत्याचार, अन्याय आणि अधर्माचा नाश करण्यासाठी धर्माची राजवट उभारण्याचे स्वप्न पाहिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी देव, देश आणि धर्म तसेच रयतेच्या रक्षणासाठी स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी प्रथमच अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. शेतकऱ्यांना व रयतेला सोबत घेऊन कृषी क्रांती, सैनिक क्रांती, आर्थिक क्रांती, धर्म आणि सांस्कृतिक क्रांती करीत शेतकरी व रयतेच्या हिताचे निर्णय घेऊन अंमलबजावणी केली. स्वराज्यात शेतकऱ्यांना बी बियाणे, यंत्र, अवजारे मोफत दिली जात होती. शून्य टक्के व्याजाने शेतकऱ्यांना कर्ज, शेतसारा मध्ये मध्ये सवलत देऊन दोन वेळचे भोजन देखील मोफत दिले जायचे. शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले. शेती उत्पन्न वाढीसाठी प्रोत्साहन दिले. कास्तकरी, बलुतेदारांना, अलुतेदारांना कृषीक्रांती नंतर अर्थक्रांतीसाठी मदत करून प्रोत्साहन दिले. कृषीक्रांती बरोबर सैन्य क्रांती ही केली. नंतर अर्थक्रांती केली. रयतेच्या मनामध्ये प्रखर राष्ट्रवाद निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व होते. स्वभाषेचा त्यांनी पुरस्कार केला. राजमुद्रेवर, चलनी नाण्यांवर सर्वात प्रथम देवनागरी लिपी आणि संस्कृत भाषेचा वापर केला. रघुनाथ पंतांना सांगून संस्कृत भाषेतील पहिला शब्दकोश तयार केला असेही हभप शिरीष महाराज मोरे यांनी सांगितले.स्वागत महेश गावडे आणि आभार सुहास पोफळे यांनी मानले.

# शिक्षकांना दिलासा : मतदान झालेल्या मतदारसंघांमध्ये शिक्षक नियुक्ती

पुणे : : केंद्रीय निवडणूक आयोगाने प्रत्यक्ष मतदान झालेल्या ठिकाणातील शिक्षकांच्या नियुक्तीबाबत कार्यवाही करण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार राज्याच्या ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव यांना विनंती करण्यात आली असून, जिल्हा परिषदेच्या सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना त्यांच्याकडून शिक्षक भरती संदर्भातील निर्देश दिले जात आहेत, अशी माहिती राज्याचे शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिली.

शालेय शिक्षण विभागातर्फे पवित्र पोर्टलच्या माध्यमातून राबविल्या जात असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेला लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे अडथळे निर्माण झाले होते. परंतु निवडणूक झालेल्या जिल्ह्यात शिक्षक भरतीची पुढील प्रक्रिया करण्यास केंद्रीय निवडणूक आयोगाने परवानगी दिली आहे. त्याबाबत शिक्षण विभागाने बुलेटीन प्रसिद्ध केले असून, त्यात जिल्हा परिषदेचे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना त्यांच्याकडून शिक्षक भरती संदर्भातील निर्देश दिले जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

पहिल्या फेरीतील कार्यवाही सुरू असतानाच पुढील निवड फेरी घेण्याच्या दृष्टीने सर्व नियमांचे पालन करून प्रशासकीय प्रक्रिया करण्यात येत आहे. पुढील फेरीमधील माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व तत्सम पदातील वेगवेगळ्या घटकांच्या मागण्या विचारात घेता समन्यायी पद्धतीने व शासन निर्णयातील सूचनांचे योग्य ते पालन करून भविष्यात कोणतीही न्यायालयीन गुंतागुंत होऊ नये याची योग्य ती दक्षता घेऊन कार्यवाही करण्यात येत आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन पुढील निवड फेरीसुद्धा लवकरात लवकर घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

२०१७ भरती मधील दि. २९/११/२०२३ रोजी प्रसिद्ध झालेल्या यादीबाबत न्यायालयीन प्रकरणांमधील स्थगनादेश उठवण्याच्या दृष्टीने सिविल एप्लीकेशन दाखल करण्यासंदर्भात शासकीय अभियोग्यता यांना विनंती करण्यात आली असून, त्याबाबतची न्यायालयीन प्रक्रिया पार पाडण्यात येत आहे. उर्वरित भरती प्रक्रिया तसेच भरती प्रक्रियेतील अन्य अडचणी दूर करण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून सतत केला जात आहे.या भरती प्रक्रियेमध्ये सुरुवातीपासूनच काही मंडळी कोणतीही अधिकृत माहिती नसताना तसेच प्रशासकीय कार्यपद्धती, निर्णय प्रक्रिया अथवा नियम याची जुजबी माहितीसुद्धा नसताना स्वतःच्या मनाने काही संभ-म निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्यापासून सावध राहावे. तसेच ज्या वेळी महत्त्वाच्या घटना घडतील त्या वेळी बुलेटिनद्वारे माहिती दिली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.